## प्रकरण ३

## तळाकडून इतिहास

### महाराष्ट्राती सशस्त्र उठाव: खानदेशच्या विशेष संदर्भात:- १८१८-३१

खानदेशातील जमातीत भिल्लांची संख्या मोठी आहे. हे लोक राजपुताना, माळवा, गुजरात व वायव्य महाराष्ट्रभर पसरले आहेत. यांचे अधिष्ठान रानांत, डोंगरकपारीत, सह्याद्रि-सातपुड्याच्या अगदी कुशीत यांची वस्ती. सह्याद्रीच्या टेकड्यांची साखळी विंध्य अगर सातपुड्याला उत्तेस जाऊन भिडते त्या साखळीचे दुवे हे भिल्ल होत. हाच घाटमाथा खानदेश जिल्हा वेष्टून आहे. पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश व नाशिक या तिन्ही जिल्ह्यांत या आदिवासी जमातीची संख्या मोठ्या प्रमाणांत होती व आजही आहे.

ह्या जमातीच्या उदरनिर्वाहास स्वतःचे असे कायम स्वरूपाचे काही साधन नाही. बहुसंख्य लोक हल्ली शेतमजूर म्हणून कुणातरी शेतकऱ्याजवळ तात्पुरते काम करतात. काही लोक गवत, जळाऊ लाकूड वगैरे जंगलांतील उत्पन्नावर काही काळ उपजीविका करतात, तर काही शहराच्या आसपास राहून मजुरी करतात. पण डोंगरकपारीत राहणाऱ्यांची श्रीमंत जमीनदारांपासून मिळालेल्या लुटीवरच गुजराण असते.

इंग्रज लोकांनी या प्रदेशाचा ताबा मिळवण्यापूर्वी हा प्रदेश पुष्कळ लोकांनी उद्ध्वस्त केला होता. अरब लोकांनी याचा स्वतःच्या फायद्याकरिता गैरउपयोग करून घेतला होता आणि त्या वेळचे अधिकारी तर मन माने तैसे चरले होते. त्रिंबकजी डेंगळे, यशवंतराव होळकर यांनी तर भिल्लांना त्राही भगवान करून सोडले होते.

१८१६ मध्ये पेंढाऱ्यांची टोळधाड आली ती पूर्वेकडील टेकड्यांतील मुसलमान भिल्लांच्या मदतीनेच. त्यांनी भिल्लवस्तीच्या प्रदेशाची जाळपोळ आणि लुटालूट करून पूर्वीच्या अरब व मराठे या आक्रमकांवर मात केली. 'या सर्व घटनांमुळे सबंध खानदेश यादवीप्रत जाऊन पोहोचला तो इतका की एल्फिन्स्टनने या यादवीची तुलना आशियातील कोणत्याही यादवीशी होऊ शकत नाही असे म्हटले आहे.

वारंवार येणाऱ्या संहारक संकटांमुळे भिल्ल जमात फारच हवालदील झाली. त्यांना संरक्षक कोणीच राहिले नाहीत. त्यांचा त्राता कोणीच नव्हता. त्यांनी स्वसंरक्षणाकरिता डोंगरांत राहण्याचे ठरविले. डोंगरांतील टेकड्यांवर प्रत्येक वस्तीच्या भोवती मजबूत तटबंदी उभारली आणि ही जमात एकोप्याने टोळ्याटोळ्यांना आपल्या मुख्याच्या नेतृत्वाखाली राहू लागली.

१८१८ मध्ये इग्रजांनी खानदेशावर पूर्ण ताबा मिळविला. नवी विटी नवे राज्य या न्यायाने प्रत्येक नवीन सत्ताधीशांच्या कारकीर्दीचा प्रसाद भिल्लांना मिळत असल्यामुळे, या आंग्ल राजवटीबद्दलही त्यांच्या मनांत तिरस्कार व घृणाच उत्पन्न झाली. ते खुशीने या राजवटीपुढे नमायला तयार होईनात. त्यांनी या गोऱ्या लोकांना आपला इंगा दाखविण्याचे ठरविले. यासाठी सातपुडा, सातमाळा आणि अजंठाच्या कुशीत वावरणारे सर्व भिल्ल एक झाले. त्याचे नेतृत्व बत्तीस भिल्लांनी स्वीकारले. हा सर्व भिल्लांचा जमाव हातांत तलवारी आणि बनोट्या घेऊन बाहेर पडला. याच सुमारास सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत राहणाऱ्या भिल्लांनी जवळपासच्या खेड्यांत आपल्या भयानक कृत्यांनी बराच घबराट निर्माण केला. पण त्यांना ब्रिटिशांविरुद्ध उठविण्याचे काम दुसऱ्या बाजीरावाचा दोस्त सरदार त्रिंबकजी डेंगळे याचे. ठाण्याच्या तुरुंगातून इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन पलायन केलेल्या या बिलंदराने फिरंग्यांना त्राही भगवान करण्याचे शस्त्र शोधून काढले. तो मिल जमातीत शिरला. भिल्लांना इंग्रजांविरुद्ध चिचवले आणि तुम्हाला कायमचे गुलामीत टाकणाऱ्या या फिरंग्यांचे मुडदे पाडा असा आदेश दिला. या उठावाची सर्व सूत्रे त्याने आपले दोन पुतणे गोदाजी डेंगळे आणि महिपा डेंगळे यांच्या हाती सोपविली. या उठावांत सुमारे ८,००० मिल्लांनी भाग घेतला.

पण यामुळे इंग्रज घाबरला नाही. त्याने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. स्वतः कें. ब्रिग्जने त्यांच्या पुष्कळ पुढाऱ्यांचे मुडदे पाडले." त्यांच्या हालचालींना आळा घालण्याकरिता डोंगरांतील घाटवाटांवर सैन्य ठेवण्यात आले आणि त्यांना मिळत असलेली रसद बंद केली.

याबरोबरच एल्फिन्स्टनने औदार्याचे धोरण स्वीकारले. चोरांच्याच हाताने चोख बंदोबस्त करण्याची शक्कल साहेबाने काढली. काही मिल्लांना वेतन देऊन त्यांच्याच रक्ताच्या लुटारू लोकांपासून घाटांत वाटसरूंचे संरक्षण

करण्याचे काम त्यांजवर सोपविले. घाटांत चोरी झाल्यास त्यांनाच जबाबदार धरण्याची प्रथा सुरू केली. आपल्याच जातीचे लुटारू व मारेकरी लोक यांजवर देखरेख करण्याकरिता काहींची नेमणूक केली." तर काहींना रखवालदाराच्या नोकऱ्या दिल्या. काहींना पेन्सनी दिल्या. शिवाय त्यांच्या हिताकरिता बऱ्याच गोष्टी करण्याचे ठरले. अशा रीतीने या बंडखोर प्रतिकात्मक पेशींच्या तडाख्यांतून त्या भागातील लोकांची तात्पुरती सुटका केली."

या मिल्लांच्या बाबतीत अनुभवानेच इंग्रज शहाणा झाला. त्याने हेरले की या लोकांवर यांच्या मुख्याचाच अधिकार पाहिजे. त्या मुख्यास आपल्या दावणीस जुंपून घेतले म्हणजे झाले आपले काम. एल्फिन्स्टनने या तत्त्वप्रणालीस उचलून धरले." साहेबाने मिल्लांची भरती लष्करांत करून त्यांची एक निराळी तुकडी बनविण्याचे ठरविले. कां तर या उपायाने तरी ते आपल्याकडे आपुलकीने पाहतील. हा अंदाज अगदीच चुकीचा नव्हता. त्याच उपायाने नादिरसिंह नावाचा प्रख्यात भिल्ल डाकू त्याच्याच सहकाऱ्यांच्या साहाय्याने पकडण्यात इंग्रजांनी यश मिळविले."

भिल्लांना आळविण्याचे इतके उपाय केल्यावरही त्यांनी १८१९ मध्ये पुन्हा सगळीकडून उठाव केला. त्यांच्या म्होरक्यांनी डोंगरांतील महत्त्वाच्या लष्करी नाक्यांचा कबजा मिळविला व लहान लहान तुकड्या जवळपासचे उतरणीवरील गाव लुटण्यास पाठविण्याचा सपाटा चालविला. यामुळे लोक अगदी हैराण झाले. इंग्रज सरकारनेही आपली लष्करी शक्ती पणास लावली. "कितीतरी लष्करी तुकड्या या उन्मत्त भिल्लांचा बंदोबस्त करण्याकरिता खपत होत्या. पर्वतांतील त्यांच्या वस्तीकडे जाणाऱ्या काही मोक्याच्या डोंगर वाटांवरील नाकी इंग्रज सैनिकांनी जिंकून घ्यावी की लागलीच तिथे नवीन पुढारी निर्माण होई आणि ते नाके जिंकून तो आपल्या ताब्यात घेई. अशा रीतीने हे "अरण्य युद्ध" चालू होते. इंग्रज सरकारच्या माफीच्या जाहीरनाम्यालाही त्यांनी भीक घातली नाही. इंग्रजांनी देऊ केलेल्या सवलती आणि त्यांना होणारा ज्ञातीचा फायदा याचीही त्यांनी तमा बाळगली नाही,

सामदामाने निकाल लागेना तेव्हा कंपनी सरकारने दंडाची उपाययोजना जारी केली. सरकारकडून एकामागून एक अशा स्वाऱ्या पाठविण्यास सुरुवात झाली. त्यांच्या म्होरक्यापैकी एक सातमाळ्याचा भिल्ल नाईक याला पकडले आणि फाशी दिले. "पण सबंध भागच गोंधळलेल्या स्थितीत होता. के. ब्रिग्ज मुंबई सरकारास येथील परिस्थितीसंबंधीचे रिपोर्ट पाठवायचा, निरनिराळे उपाय सुचवायचा. गव्हर्नर आणि कौन्सिलचे सभासद मुंबईपासून कलकत्त्यापर्यंत ब्रिग्जच्या सूचनांचे कौतुक करीत." पण प्रत्यक्षांत वस्तुस्थितीचा पालट निराळाच होई. १८२० मध्ये या सर्व गडबडीने उग्र स्वरूप धारण केले. डसरत व धानजी या लासूरच्या मुख्यांनी सर्रास सर्वांची घरे बेचिराख करण्याचे सत्र आरंमिले. तापी व सातपुडा यांमधील सुपीक प्रदेश बेचिराख केला. "त्यांच्या जोडीला शेख दुल्ला हा पेंढारी पुढारी मिळाला. या सर्वांनी संधी मिळेल तो गाव उद्ध्वस्त करण्याचा धुमधडाका चालविला. पण लवकरच या गोष्टींना आळा पडला. मेजर मौरिनने शंभर मैलावरील टापुंतील महत्त्वाच्या जागा जिंकून घेतल्या आणि दक्षिणेतील मिल्ल प्रमुखांना शरण येणे भाग पाडले.

**हरियाचा उठाव**

१८२२ मध्ये हरिया नावाच्या भिल्लांच्या प्रसिद्ध म्होरक्याने उठाव केला. तो इतका परिणामकारक झाला की सबंध देशच मुळी अराजकात सापडला. अंदाधुंदी, बलात्कार, शोषण यांना तर सीमाच राहिली नाही." मिल्लांच्या टोळ्या सर्व बांजूनी लूटालूट करू लागल्या. त्यामुळे ठिकठिकाणचे मामलेदार लोकांमध्ये पसरलेल्या अतिघबराटासंबंधीचे खलिते सरकारला पाठवू लागले व त्यामध्ये कें, रॉबिनसनने त्यांच्या टोळ्यांना पळवून लावण्यात आणि त्यांच्या वस्तीवर हल्ले करून त्यांचा पिच्छा पुरविण्यात थोडे यश मिळवले.

पुढील दोन वर्षांत भिल्लांच्या बाबतीत के. सरकारने सर्पसत्राच्या स्वरूपाचे हत्याकांड चालू केले. धर तो मार अशा रीतीने पुष्कळांचे जीव घेतले, काहींना अतिकठोर शिक्षा ठोठावल्या पण म्हणून हे गिरीजन नमले का? मुळीच नाही. १८२५ मध्ये या भिल्ल उठावाने महत्त्वाचा टप्पा गाठला." आता त्याला वेगळेच स्वरूप यायला लागले. काही राजकारणी लोक या भिल्ल लोकांचा उपयोग करू लागले. सेवाराम नावाच्या सोनाराने सातारा राजाच्या नावाची बनावट पत्रे तयार करून राजाच्या हुकुमाप्रमाणे बागलाण तालुक्यातील मिल्लांना उठावाचे प्रोत्साहन दिले." त्यांनासुद्धा निमित्तच

हवे होते. ८०० भिल्लांनी उनापूरवर हल्ला केला आणि मिळेल ती लूट ते मुरली महाल किल्ल्यात घेऊन गेले. पण लागलीच ले. औटरेंमने अचानक हल्ला करून त्यातील काही लूट परत मिळविण्यात यश मिळविले. सेवाराम आणि त्याचे हस्तकही कालांतराने पकडले गेले. पण त्या सर्वांसच यावेळी यमसदनास पाठविले नाही. त्यांपैकी बहुतेकांना माफी देऊन शेतीच्या धंद्यास लावले. भिल्ल शांत व्हावेत म्हणून इंग्रज सरकार प्रयत्न करीतच होते. त्यांना शेतमजूर म्हणून कामास लावणे, जमिनी देणे, तसेच तगाई देणे या गोष्टी सुरू केल्या. पण पंड्या, बंदी, सूखा यांसारखे भिल्लांचे म्होरके धुमाकूळ घालतच होते. या सर्व गोष्टी थांबविण्याकरिता भिल्लांना माणसांत आणण्याचे ले. औटरॅमचे उद्योग चालूच होते. तो त्या लोकांत राहू लागला." त्यांच्याबरोबर खाऊ पिऊ लागला. नाचू लागला. थोडक्यात त्यांच्याशी एकजीव झाला आणि त्याने त्या लोकांना इंग्रज लोक ही किती प्रामाणिक असतात हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. इंग्रज लेखक यामुळे या माणसाचे गुणगान गातात.

माफीचे जाहिरनामे, त्यात मिल्लांना जमीन देण्याचं, तगाई देण्याचं आश्वासन, मागील गुन्ह्यांची माफी आणि त्यांची सैन्यात भरती या गोष्टी त्यांना नरम करण्यास कारणीभूत झाल्या. हळूहळू सामाजिक संस्थांत कार्य करण्याकरिता त्यांना उद्युक्त करण्यात येऊ लागले. डोंगरांतील वाटांचं रक्षण करणं हा त्यांचा पारंपरिक हक्क मान्य करण्यात आला तरी पण १८२६ मध्ये डांगचे प्रमुख आणि लोहारा भिल्ले यांनी उचल खाल्लीच आणि लुटीचा सपाटा चालू केला. पण त्यांना लौकरच शरण यावं लागलं. चौकशीअंती आढळून आले की या उद्योगांत देशमुख लोकही मिल्लांना मदत करीत असत. १८२७ मध्ये ले. औट रैमने भिल्ल लष्कर तुकडीच्या सहाय्याने एका भिल्ल टोळीला चकविलं आणि फडशा पाडला. "आणि म्हणूनच १८२८ मध्ये या भिल्ल प्रदेशांत शांतता नांदू लागण्याची चिन्हे दिसू लागली. या वर्षीच्या पहिल्या सहामाहीत वीस वर्षांनंतर त्या भागात शांतता होती असे त्या वर्षाच्या रिपोर्टात आढळते. तरी पण पुढील काही वर्षे बंडवाल्यांचे हस्तक डाके घालण्याची कामे करीतच होते.

**१८५७ च्या उठावाचे निमित्तः काजीसिंगास मिळालेल्या शिव्या**

आतापर्यंतचे भिल्लांचे उठाव जरी पोटार्थी असले तरी १८५७ तील उठावाचे स्वरूप मात्र पूर्वीचेच राहिले नव्हते. या उठावात तत्कालीन राजकारणाचा रंग भरला गेला. त्याची प्रचिती पुढील विवेचनावरून कळून येईल.

काजीसिंग हा भिल्लांचा नायक, कंपनी सरकारच्या नोकरीत १८३१ ते १८५१ पर्यंत होता. त्याने इमाने इतबारे सरकारची २० वर्षे चाकरी केली. सिध्वा ते सीरपूर या ४० मैलांच्या जंगलातून जाणाऱ्या रसत्यावरील भिल्ल पोलीसांवर देखरेख करण्याचे काम त्याने चोख बजावले. १ या काळात चोरीचा किंवा खुनाचा असा गुन्हा त्या भागात झाला नाही. त्याने दरोडेखोर भिल्लांचा पाठलाग करून पकडून देण्यातही मे. ग्रॅहॅम, मे. मॉरिस, कॅ. रोझ, मे. केर यांना बहुमोल मदत केली होती. पण १८५१ मध्ये त्याच्यावर बालंट आले. सिंध्वा रस्त्यावरील चोरीत सापडलेल्या गुन्हेगारास त्याने बेदम मारले, तो मेला. काजीसिंग खुनी ठरला. सरकारने त्याला १० वर्षाची सजा ठोठावली. पण दयाळू होऊन १८५५ मध्ये मुक्त केले. २ ज्यांना त्याने पूर्वी मदत केली होती अशा कॅ. रोझ, मे. हमलेकड या गृहस्थानी त्याला पुन्हा नोकरीत ठेवण्यासाठी कंपनी सरकारला विनविले. पण त्याचा उपयोग झाला नाही. १८५७ चा मे महिना आला. बंडाच्या बातम्या धडकू लागल्या. इंग्रजांचे धाबे दणाणले. भिल्ल लोक स्वस्थ बसणार नाहीत हे त्यांनी जाणले. काजीसिंगला नोकरीत घेतल्याने खानदेश जिल्ह्यातील भिल्ल प्रदेशातील सिंध्वा रस्ता मोकळा राहील व सरहद्दीवरील भिल्लांच्या उच्छृंखलपणास पायबंद बसेल असे कंपनी सरकारला वाटले आणि म्हणून त्यास १८५७ च्या जूनमध्ये नोकरीत घेतले. पण काजीसिंगने यावेळी उत्तर व मध्य हिंदुस्थानातील उठावाच्या शोकजनक हकिकती ऐकल्या होत्या. वरवानी नाईकानी हल्ले करूनही कंपनी सरकारकडून त्यास काही शासन झालेले नव्हते हेही त्याने पाहिले होते. इंग्रज सत्ता आता खलास होत आलेली आहे असा त्याचा कयास झालेला होता आणि वाडवडिलांनी चोखाळलेला लुटीचा मार्ग पत्करावा लागणार असे त्याचे मन सांगू लागलं. दिल्लीहून उठावाच्या आज्ञा काजीसिंग, भीमा आणि मवासिया नाईक यांना मिळाल्या. त्यातच काजीसिंगला नोकरीवर असताना कॅ. बर्च व रिसालदार यांच्याकडून शिव्या खाण्याचे निमित्त झाले. आगीत तेल ओतले. काजीसिंगने कंपनी सरकारला सतावण्याचे सत्र सुरू केले. ३ त्यास पलीकडील प्रदेशातून आलेल्या बंडवाल्यांची फूस मिळाली. होळकरांच्या सैन्यातून काढून टाकलेले लोक, झांशी, कोटा या ठिकाणी पराभूत झालेले

लोक भिल्लभूमीत शिरले होते. मग काय विचारता? भिल्लांच्या उठावाचा धूमधडाका सुरू झाला. जवळपासच्या गावांवर छापे घालणे, सरकारी खजिन्यांची लूट करणे, अफूच्या गाड्यांची लूट यांचे सत्र सुरू झाले.

या उठावास खरी सुरुवात १८५७ च्या सप्टेंबरमध्ये झाली. ४ खानदेशच्या भिमा नाईकाच्या नेतृत्वाखालील भिल्लांनी ले. केनेडीच्या पार्टीवर हल्ला चढविला आणि त्याला चित केले. याच भीमा नाईकाने खानदेशच्या पोलीस अधिकाऱ्यांना फर्मावले की, तुम्ही सरकारशी एकनिष्ठ रहात आहात त्याचे परिणाम वाईट होतील. मी हे दिल्ली बादशहाच्या आदेशानुसार तुम्हास बजावीत आहे.५ या भिमा नाईकाला पकडण्याकरिता सरकारने एक हजार रुपयांचे बक्षीस लावले. ६ पण बक्षीस जाहीर केल्याची शाई वाळते तोच ता. २९ ऑक्टोबरला रात्री भिमा नाईक, काजी नाईक आणि दुसरे पुढारी यांच्या नेतृत्वाखाली १,५०० भिल्लांनी सिरपूरवर हल्ला चढविला. मिळेल ती लूट घेऊन ते निघून गेले. ७ त्यांचा पाठलाग करण्याकरिता कॅ. बर्च गेला. ५६ मैल अंतर गेल्यावर ते भिल्ल जंगलात नाहीसे झाले, या सबबीवर बर्चला हात हलवित परत यावे लागले.

१ नोव्हेंबरला काजीसिंग, भिमा वगैरेंनी मिळून खानदेश जिल्हाधिकाऱ्यांच्या तळापासून ६ मैलांच्या आत असलेली दोन खेडी लुटली. त्याचवेळी खाला नाईकाने सुलतानपूर तालुक्यातील एक गाव लुटले.

मुंबई सरकारकडे या लुटालुटीच्या व उठावाच्या बातम्या जिल्हाधिकाऱ्यांकडून लगेच लिहून येत होत्या. पण त्यात बंदोबस्ताचा उल्लेख नसायचा. कारण बंदोबस्ताकरिता लागणारे पुरेसे सैन्य खानदेशात नव्हतेच मुळी.

एक वेळी अशी बातमी दिली की, खानदेश व अहमदनगर जिल्ह्याच्या सरहद्दीवर पतोडा तालुक्यात काही भिल्ल जमले असून सिन्नरकडील ४०० भिल्ल त्यांना लवकरच मिळाणार आहेत. १० यावरून सबंध भिल्ल जमातच उठाव करण्याच्या उद्योगास लागल्याचे सिद्ध होते. तेव्हा सरकारने त्यांजविरुद्ध जालीम उपाय योजावेत अशी शिफारस मुंबई सरकारला जिल्हाधिकाऱ्याने केली.

**सात लाखांची लूट**

या शिफारशीचा विचार होऊन प्रतिकारास सुरुवात होण्याच्या आतच ता. १७ नोव्हेंबर रोजी भिल्ल लोकांनी सिंध्वा घाटात होळकर हद्दीत एक मोठा डाका घातला व सात लाखांचा खजिना घेऊन जात असलेल्या बैलगाड्या लुटल्या. खूप चंगळ झाली. सरकारने या डाक्याची धास्ती घेतली. होळकरांच्या सहेतुक दुर्लक्षामुळे हा प्रकार घडला असे इंग्रज अधिकारी कुजबुज लागले. या लुटीची हकीकत मोठी मनोरंजक आहे. थैल्या घेऊन जाणाऱ्या खटाऱ्यांपाशी सुमारे ३०० भिल्ल जांभळी चौकात आले. त्यांनी खटाऱ्यांना गराडा घातला. संरक्षकांची संख्या २०० होती. त्यांनी बंदुकीच्या फैरी सुरू केल्याबरोबर हे भिल्ल दूर उभे राहिले, पण पळून गेले नाहीत. हे पाहून संरक्षक प्रमुख धिग्रज व चतुरभूज, भिल्ल नेत्यांपाशी गेले आणि कुंपणाने शेत खावे त्यातील गत झाली. चतुरभुजाने तिजोरीच्या रखवालदारास सांगितले की, भिल्लनेता काजी नाईक हा या खटाऱ्यांचे संरक्षण करण्याकरिता आला आहे. तुम्ही दूर व्हावे, झाले रक्षक दूर झाले. चोहोंकडून भराभर भिल्ल आले. लुटीला सुरुवात झाली. त्यात रक्षकांनीही हात धुवून घेतला. चांदी रुपयांनी तुंबड्या भरल्या. भिल्लांनी लूट केली असा बोभाटा मात्र झाला. याचा पुढे इंग्रजांनी छडा लावला. कॅ. बर्चला त्या लुटीतील काही चांदीचे बार सुद्धा सापडले. या सात लाखांच्या लुटीवर खूष होऊन काही काजीसिंग व त्याचे साथीदार गप्प बसले नाहीत. त्यांनी अफूने भरलेल्या ६० गाड्याही लुटल्या, सरकारी पोस्ट लुटले, सिंध्वा घाटातील टेलिग्राफ ताराही तोडल्या. वरील उद्योगात नाईक काजीसिंगला भीमा नावाच्या त्यांच्यातील प्रसिद्ध नेत्याचं पाठबळ मिळालं होतं. ह्या दोघांनी मिळून पंधराशे लोक जमा केले आणि सातपुड्याच्या रांगेतून खाली उतरून सुलतानपूरजिल्ह्यातील लोकांना त्राही भगवान् करून सोडले. त्यांच्या या आक्रमणाचा धोका शाडा आणि दुसऱ्या गावांना होण्याची भीती होती. या दोघा खंद्या वीरांना नगर-नाशिकच्या बाजूचा भागोजी नाईक आपल्या साथीदारांसह मदत करू लागला. उफाळलेल्या समुद्रास वाऱ्याने साथ दिली. धारच्या सेनेतून मोकळे झालेले मक्राणी - विलायती (पठाण) वगैरे दोन हजार साथी त्यांना येऊन मिळाले. या सर्वांनी सिंध्वा किल्ल्यानजीकचा मुंबई - आग्रा रस्ता अडविला. कंपनी सरकारला या लोकांच्या एकजुटीने भितीच उत्पन्न झाली. राजा या बंडखोरांना वस्त्रे व अवश्यक जिन्नस गुपचूप पुरवित होता, हे १८५८ च्या एप्रिलमध्ये पहिल्या अठवड्यात उघडकीस आले.

**अंबापाणीची लढाई**

भिल्लांचा उपद्रव वाढत चालला आहे. इंग्रज पलटणी त्यांच्या संहाराकरिता जंग जंग पछाडत होत्या. भिल्लही त्यांना पुरून उरले होते. मेजर इव्हान्सेन भीमा आणि मोवासिया नाईक यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगून वाटाघाटी करण्यास बोलविले. पण वाटाघाटी फिसकटल्या. तेव्हा मे. इव्हान्सने या भिल्लांच्या जमावावर कडाडून हल्ला चढविला. या जमावांत भिल्ल नेते काजीसिंग, दौलतसिंग व काळू बाबा हे होते. ते नकराने लढले. इंग्रज सेनेला त्यांनी पुरा मार दिला. कॅ. बर्च, ले. वेसवी हे अधिकारी जखमी झाले व क हिंदी अधिकारीही मारला. भिल्लसेनेपैकी ६५ मेले व १७० जखमी झाले. ही लढाई अंबापाणी (खानदेश) येथे ता. ११ एप्रिल रोजी झाली.

याच झटापटीत भिल्लांच्या इतक्याच त्यांच्या खियाही धोक्याच्या, उपद्रवकारक असल्याचे कंपनी सरकारला आढळून आले. तेव्हा ४०० वर भिल्ल स्त्रिया पकडल्या. त्यांत काजीसिंग, मोवासिया नाईक आणि करीचा माऊ रावळ यांच्या बायका प्रमुख होत्या. भागोजी नाईक, भीमा नाईक आणि काजीसिंग हे सापडेपर्यंत त्यांच्या स्त्रियांना ओलीस ठेवण्याचा आदेश मुंबई सरकारने दिला होता. अंबापाणी लढाईनंतर "ड्रम ट्रायल" खटले होऊन ६२ आरोपींपैकी ५७ लोकांना गोळी घालून ठार करण्याची सजा दिली.

पण याचा बदला नगरच्या भिल्लांनी घेतला. नांदगावच्या आसपास ते गाळा झाले. ही बातमी ले. स्टुअर्टला कळल्याबरोबर तो आपल्या ३०० सैनिकासंह गेला. भिल्लांची संख्या ४०० च्या आसपास होती. त्यांनी नदीकिनाऱ्याने लगतच्या दाट झाडीचा आश्रय केला होता. लढाई जुंपली, भिल्लांनी इंग्रजांवर अक्षरशः आग ओकायला सुरुवात केली. त्यांच्या आगीच्या माऱ्याने कॅ. मॉन्टगोमेरी जखमी झाला. ले. चेंबरलेन, स्टुअर्ट व डाक्सिन यांनाही तसाच तडाखा बसला. ले. स्टुअर्ट दुसऱ्या दिवशी ता. २१ रोजी ख्रिस्तवासी झाला. इंग्रजांकडील ५० जखमी झाले. व १९ मृत्यू पावले तर भिल्लांकडील २५ लोक कामास आले. खानदेशात शिरपूर, सुलतानपूर, पाचोरा, यावल आदि तालुक्यांत वर्षभर चकमकी झडतच राहील्या.

**महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ व कामगार चळवळ**

**शेतकरी चळवळ (इ.स. १८१८-१९६०) :-**

महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ असा अभ्यास आपण करणार आहोत. पण आम ज्यास आपण मराठवाडा म्हणतो तो प्रदेश हैदराबादच्या निझामाच्या राजवटीचा एक भाग होता. तेव्हाच्या मुंबई प्रांतात आजचा विदर्भ, खानदेश, मुंबई, कोकण, गुजरात प्रांत मोहात होते. कोल्हापूरसह दक्षिण महाराष्ट्रात १६ छोटी संस्थाने होती. तसेच कर्नाटकातील तील जिल्हेही होते.

१) उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्ह्यातील रामोशांचे बंड :- २) खानदेशातील भिल्लांचे उठाव (याचा उल्लेख यापूर्वी प्रकरण ५-अ) वसाहतवादी राजवटीस प्रारंभीचा विरोध या उपगटात आलेला आहे.)

३) म. फुले : शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे पहिले भाष्यकार शेतीच्या प्रश्नांचा व शेतकऱ्यांच्या एकूण जीवनाचा समग्र व सूक्ष्म अभ्यास फुले यांनी केला होता.

'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा असून त्यात त्यांनी भिक्षुकशाही, नोकरशाही व सावकारशाही यांच्याकडून शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण व अडवणूक होते असे म्हटले होते. गर्भाधान संस्कारापासून ते मृत्यूपर्यंत शेतकऱ्यास धर्माचे ओझे वाहावे लागते. ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी राजेरजवाडे यांच्याकडे शूद्र शेतकऱ्यांपैकी लक्षावधी लोकांना नोकऱ्या मिळत; पण ब्रिटिशांचे राज्य आल्याने २५ लक्ष शेतकरी बेकार झाले व त्याचा बोजा शेतीवर पडला असा हिशेब ते मांडत्तात. नोकरशाही ही शेतकऱ्यांच्या श्रमावर पोसलेली आहे, ती भ्रष्ट आहे, शेतकऱ्यांची अडवणूक करते, ऐषआरामाचे जीवन जगते हे त्यांनी दाखवून दिले. ब्राह्मण व मारवाडी सावकार हे शेतकऱ्यांना कर्ज देताना कर्जरोखे लिहून घेतात. स्टँप लिहिण्याचा खर्च व व्याज अगोदरच कापून घेतात. व्याजाचे प्रचंड दर, हिशेबातील खोटपणा, फसवणूक यामुळे शेतकऱ्यास त्याचे शेत क्वचित परत मिळते असे म. फुल्यांचे निरीक्षण होते.

'शेतकऱ्याचा आसूड' मधील चौथ्या प्रकरणात फुल्यांनी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, अन्न, वस्त्र, शेतकऱ्यांची घरे, दागिने, लग्नातील पदार्थ इत्यादीचे अत्यंत सूक्ष्म चित्रण (खाटले आहे. भाजीपाला विकताना नगरपालिकेची जकात,

गाडीभाडे व भाजी मार्केटमधील दलालांचे पैसे दिल्यानंतर शेतकऱ्यांच्या हाती काहीच पडत नाही हे वास्तव त्यांनी मांडले. शेती सुधारणेसाठी त्यांनी अत्यंत मूलभूत अशा उपाययोजना सुचविल्या होत्या. (प्रस्तुत ग्रंथात प्रकरण ४ मध्ये म. फुले आर्थिक विचार हे युनिट पाहावे.) शूद्र शेतकऱ्यांची मुले सरकारी हुद्दे चालवण्यालायक होईपर्यंत ब्राह्मण जातीला त्यांच्या संख्येपेक्षा जास्त नोकऱ्या देऊ नयेत, पाटीलकीसाठी किमान सातवी पास ही अट ठेवावी म्हणजे पाटीलकीच्या आशेने शेतकरी आपल्या मुलांना शिकवतील असे ते सुचवतात. ब्रिटिशांनी शेतसारा प्रचंड वाढविल्यामुळे शेतकरी हिंमत खचला व त्यास शेती करावीशी वाटेना हे वास्तव त्यांनी मांडले. गोरी नोकरशाही दौलत, विद्या, अधिकार यांच्या धुंदीत असल्याने व तिचे अज्ञानी शेतकरी कुटुंबाशी मुळीच दळणवळण नसल्याने गोऱ्या नोकरशाहीला येथील शेतकऱ्यांची दुःखे समजत नाहीत असे फुले म्हणतात. सरकारने जंगलखाते काढून पर्वत, डोंगरदऱ्या व पडीक जमिनीवर ताबा मिळवल्याने गवत, लाकूड, फळे विकून जगणारांची अडचण झाली हे वास्तवही त्यांनी मांडले. शेतकऱ्यांच्या मुलांची लग्ने त्यांचे आईवडील त्यांच्या संमतीविना करून देतात. पुढे ती मुले पुनर्विवाह करतात. अज्ञानी शेतकऱ्यात बालविवाहाची पद्धत असल्याने त्यांची संतती वीर्यहीन होत चालली आहे. शेतीचा उत्पादन खर्च, शेतसारा, लोकल फंड देऊन जिवापाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना दरमहा दरमाणशी ही उरत नाहीत हे वास्तव्य त्यांनी मांडले. रु

**४) कृष्णराव भालेकर व शेतकऱ्यांचे प्रश्न:** कृष्णराव भालेकर हे म. फुल्यांचे अत्यंत निकटचे सहकारी होते. शेतकऱ्यांना उपदेश करणाऱ्या लावण्या इ.स. १८८८- ८९ मध्ये 'दीनमित्र' पत्रातून त्यांनी लिहिल्या. शेतकरी व कारागीर हेच देशाचे खरे आधारस्तंभ आहेत; शेतकरी थंडी, ऊन, पाऊस, अंधार याची पर्वा न करता आपल्या बायका मुलांसह विश्रांती न घेता कष्ट करतो, निकृष्ट अन्न खातो, सावकार शेतकऱ्यांचे शोषण करतात; शेतसाऱ्याच्या रूपाने सरकारही शेतकऱ्यांचे शोषण करते, असे वास्तव त्यांनी मांडले. शेतकऱ्यांना उद्देशून त्यांनी म्हटले होते, 'आपापल्या गावी विद्येचे एक एक देऊळ बांधा, प्रत्येक देवळात चांगला पुजारी ठेवा व आपली मुले त्या देवळात बसवून विद्येची भक्ती एकनिष्ठेने करून घ्या, मग हीच विद्या प्रसन्न होऊन तुमचा उद्धार करील.' ब्राह्मणांप्रमाणे आपणही वाडवडिलांचे व्यवसाय सोडावेत असे आवाहन त्यांनी केले. विदर्भात करंजगाव येथे "The Karajgaon Industrial & Commercial Society' स्थापन करण्याची त्यांची योजना होती व त्यासाठी शेअर्सची किंमत १० रु. ठेवली होती. या कंपनीच्या संदर्भात त्यांनी एक विस्तृत योजना तयार करून ती शेतकऱ्यांपुढे मांडली होती. त्यांची ही योजना प्रत्यक्षात आली नाही तरी एका अर्थाने ते महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे वैचारिक जनकच ठरतात. भालेकरांनी शेतकऱ्यांचे प्रबोधन केले. तीर्थयात्रा, तमाशे, उत्सव यात शेतकरी वेळ व पैसा घालवतात असा आक्षेप नोंदवून त्याठिकाणी ब्राह्मण, मारवाडी व पारशी यांची मुले दिसतात का? दुष्काळी कामांवर या जातीची मुझे का दिसत नाहीत? असे प्रश्न त्यांनी विचारले होते.

५) पुणे व नगर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचे उठाव भारताची बाजारपे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडली गेल्याने युरोपातील मंदीचा परिणाम भारतातील शेतमालविर होऊन शेतमालाच्या किंमती एकदम घसरल्या (इ.स. १८७०). याच वेळी रेल्वे मार्गा बांधणीचे कामही थंडावल्याने फावल्या वेळेतील रोजगारीही बंद झाली. शेतीमालाच्या किंमती एवढ्या घसरल्या की, शेतकऱ्यांना शेतसाराही देणे कठीण झाले. सावकारांच्या ताब्यात जमिनी गेल्या. जमिनीचे हस्तांतर मोठ्या प्रमाणात होऊ लागले म्हणून चिडलेल्या शेतकऱ्यांनी पुणे व अहमदनगर, सोलापूर, नाशिक व खान्देशात इ.स. १८७५-७६ ग सावकारांच्या घरांवर हल्ले केले व सावकारांच्या घरांतील कागदपत्रे व जमिनीची गहाण खते जाळून टाकली. विशेषतः पुणे जिल्ह्यातील शिरूर, इंदापूर, हवेली, मावळ या तालुक्यातील काही गावातून शेतकऱ्यांनी सावकारांच्या घरांवर हल्ले अधिक प्रमाणात केले होते. नगर जिल्ह्यात पारनेर, कर्जत, श्रीगोंदा येथेही असेच हल्ले मोठ्या संख्येने झाले होते या उठावाने ब्रिटिश हादरले होते. हे आंदोलन अहिंसक पद्धतीने लढले गेले. काही ठिकाणी सावकारांची नाके कापण्याचाही प्रकार घडला होता. शेतकऱ्यांचे हे उठाव विस्कळीत एकाकी स्वरूपाचे होते. शेतकऱ्यांकडे स्पष्ट ध्येय नव्हते. शेतकऱ्यांच्या दंग्याची कारणी शोधून काढून त्याचे निवारण करण्यासाठी सरकारने एक आयोग नेमला. या आयोगाच्या शिफारशी विचारात घेऊनच इ.स. १८७९ मध्ये प्रथमतः सावकारीवर नियंत्रण ठेवणारी कायदा पास केला; पण शेतकऱ्यांची पिळवणूक या कायद्याने थांबली नाही. मुंबई सरकारने नेमलेल्या समितीच्या इ.स. १९११ सालच्या

अहवालात इ.स. १८७९ चा कर्जनिवारण कायदा पूर्णपणे अयशस्वी झाल्याचे म्हटले आहे. हा कायदा फारच मर्यादित होता. ६० या कायद्यावर सारखी टीका होत असली तरी तो रद्द करण्याचा किंवा त्यात सुधारणा करण्याचा कोणताही प्रयत्न सरकारने केला नाही. ब्रिटिश इतिहासकारांनी या शेतकरी उठावाची त्यांच्या लिखाणात दखलच घेतली नाही.

६) कोकणातील खोती कोकणातील खोत (जमीनदार) कुळांचे शोषण करीत त्याविरुद्ध कोकणातील कुळांच्या अनेक तक्रारी होत्या. मुंबई कायदे मंडळात खोतांच्या विरुद्ध आनंदराव सुर्वे, सी. के. बोले यांनी आवाज उठविला होता; परंतु मुंबई सरकार कायदा करून खोताविरुद्ध कुळांची बाजू घ्यावयास तयार नव्हते. बोले यांनी खोती पद्धतीविरुद्ध जनजागरण केले. खोतीचा अस्त होणार अशी भविष्यवाणी त्यांनी व्यक्त केली होती. इ.स.१९३७ मध्ये मुंबई प्रांतात बाळासाहेब खेर यांचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले तेव्हा स्वतंत्र मजूर पक्षाचे संस्थापक डॉ. आंबेडकर यांनी खोती वतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक कायदेमंडळात मांडले. त्या विधेयकात खोतांना वाजवी नुकसानभरपाई देण्याचीही तरतूद होती. पण खोती वतन नष्ट करण्याची बाबासाहेबांची मागणी खेर मंत्रिमंडळाने मान्य केली नाही. खोतांच्या कुळांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने काही तरतुदी मोरारजी देसाई यांनी मडिलेल्या कुळ कायद्यात केल्या होत्या. इ.स. १९४९ मध्ये कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यांतील बोती पद्धत नष्ट करण्याचा कायदा मंजूर झाला.

७) नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा कल पहिल्या जागतिक महायुद्धाचा फायदा भारतीय शेतकरी, व्यापारी वर्गासही झाला. युरोपीयन देश युद्धात गुंतल्यामुळे तेथील कृषी उत्पादनावर वाईट परिणाम झाला होता. अन्नधान्याचे भाव तसेच कापूस, ऊस, तंबाखू इत्यादी नगदी पिकांचे भाव वाढले. त्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणली. अन्नधान्याबरोबरच नगदी पिकांचे उत्पादन वाढत गेले. विशेषतः आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कापसाला फारच मागणी होती. गुजरात, विदर्भ, खानदेश, मराठवाडा या प्रदेशातील शेतकऱ्यांनी कापसाची लागवड प्रचंड प्रमाणात निर्यात केल्याने त्यांच्या हाती पैसाही आला. त्याचा परिणाम म्हणून शेतजमिनीच्या किमतीही वाढल्या.

८) मुळशीचा सत्याग्रह :- 'शेतकरी चळवळ' ही संज्ञा ज्या अर्थाने वापरली जाते त्याअर्थाने मुळशी खोऱ्यातील शेतकऱ्यांनी जमिनी विद्युत प्रकल्पासाठी टाटा कंपनीस न देण्यासाठी केलेली चळवळ शेतकरी चळवळ (इ.स. १९२१-२२) म्हणता येणार नाही; परंतु ती जमिनीच्या संबंधित प्रश्नांवर निरक्षर, निर्धन मावळ्यांनी शहरी भागातील मध्यमवर्गीय नेत्यांच्या (सेनापती बापट, विनायक भुस्कुटे) मार्गदर्शनाखाली आपल्या हक्कांसाठी केलेली चळवळ होती. मुळशी सत्याग्रह करून धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न झाला. डॉ. राजेंद्र व्होरा (पुणे) यांनी 'मुळशी सत्याग्रह' हा स्वतंत्र ग्रंथ लिहिला आहे. या सत्याग्रहात महिलांचाही सहभाग होता.

९) गुजरातमधील शेतकऱ्यांची आंदोलने: गुजरात हा इ.स. १९६० पूर्वी मुंबई प्रांताचा एक भाग होता. त्यामुळे खेडा व बार्डोली येथील आंदोलनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

खेडा व बार्डोली येथील आंदोलन इ.स. १९१६-१७ मध्ये गुजरातमध्ये खेडा जिल्ह्यात शेतकऱ्यांनी सक्तीच्या शेतसारा वसुलीविरुद्ध आंदोलन सुरू केले. दुष्काळी स्थिती असल्याने शेतसारा माफ करावा ही शेतकऱ्यांची मागणी होती. खुद्द म. गांधींनी या लढ्याचे नेतृत्व केले होते. शेतसारा न भरण्याचा गांधीजींनीच शेतकऱ्यांना सल्ला दिला होता. याप्रकरणी लाठीहल्ला, घरादारांची जप्ती, तुरुंगवास शेतकऱ्यांना सहन करावा लागला. शेवटी सरकारलाच माघार घ्यावी लागली व शेतकऱ्यांना सारा माफ करावा लागला. गुजरातमधील बाडर्डोली तालुक्यातील (१३७ गावे, लोकसंख्या ८७,०००) शेतकऱ्यांनी इ.स. १९२८ मध्ये सत्याग्रहास प्रारंभ केला. त्याचे कुंवरजी मेहता व कल्याणजी मेहता हे नेते होते. पाटीदारांची शेती आदिवासी करीत. त्या आदिवासींना 'कालीपराज' (काळे लोक) म्हणत. पाटीदारांनी आदिवासींचे आर्थिक शोषण केले होते. ते त्यांना फक्त अन्न व वस्त्र देत. गांधीजींचे सचिव महादेव देसाई यांनी कालीपराज लोकांची स्तुती केली असून 'स्टोरी ऑफ बाडर्डोली' या ग्रंथात ते लोक अहिंसक, निश्चल व कायदा पाळणारे आहेत असे म्हटले आहे या सत्याग्रहाचे नेतृत्व वल्लभभाई पटेल यांनी केले.

मुंबई प्रांतात सरकारने शेतसारा २२ टक्के वाढवला म्हणून बार्डोली येथे शेतकयां आंदोलन सुरू केले होते. सरदार पटेल यांनी त्या आंदोलनाचे नेतृत्व केले. त्यानंतर सरकारने एक आयोग नियुक्त केला होता. या आयोगाच्या शिफरशीनुसार भूमी करात २२ टक्क्यर्यादित सहा पूर्णांक एक चतुर्थांश वाढ केली गेली.

**१०) तुकडेबंदी व सारावाढीच्या बिलास विरोध (इ.स. १९२८)**

इ.स. १९२७ मध्ये मुंबई प्रांताच्या गृहमंत्र्यांनी तुकडेबंदी व सारावाढीसंबंधीचे विधेयक कायदेमंडळात मांडले. याचा परिणाम म्हणून छोट्या शेतकऱ्यांना जमिनीस कायमचे मकार्ष लागणार होते व शेतसाऱ्याचा बोजाही वाढणार होता. मुंबई प्रांतातील ब्राह्मणेतर चळवळी नेते केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर यांनी दोन्ही बिलांचा अनेक जाहीर सभांतून निषेध केला. २५ जुलै १९२८ रोजी पुण्यात मुंबई इलाखा शेतकरी परिषद आयोजित केली होती. त्यास ८००० शेतकरी उपस्थित होते. सारावाढ व तुकडेजोडीचे बिल कायदेमंडळाने पास करू नये असा ठराव तेथे पास झाला होता. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे व त्यांच्यात जागृती घडवून आणणे यासाठी 'मुंबई इलाखा ब्राह्मणेतर शेतकरी संघ' ही संघटना ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांनी स्थापन केली होती. इ.स. १९२०-२९ दरम्यान मुंबई प्रांतात काँग्रेस व इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी परिषदा आयोजित केल्या होत्या ११) फैजपूर काँग्रेस व शेतकऱ्यांचे प्रश्न (इ.स. १९३६) डिसेंबर १९३६ मध्ये महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यातील फैजपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याच अधिवेशनात अ. भा. किसान सभेचे दुसरे अधिवेशन भरविण्यात आले होते. मनमाड ते फैजपूर अशी २०० मैलांची पदयात्रा किसानांनी काढली होती. प्रो. एन. जी. रंगा हे किसान सभेचे त्यावेळी अध्यक्ष होते. काँग्रेसच्या इतिहासातील हे पहिलेच ग्रामीण अधिवेशन होय. हे अधिवेशन कमीत कमी खर्चात साधेपणाने शिस्तीत साजरे व्हावे यावर गांधीजींचा कटाक्ष होता. या अधिवेशनासाठी प्रेमाताई कंटक यांनी १५० स्त्रियांचे काँग्रेस सेविक्ता दल उभारले होते. पं. नेहरूंनी या अधिवेशनात आपणास वर्गसंघर्षाची संकल्पना मान्य नाही व समाजवादी तत्त्वप्रणालीवर आपली श्रद्धा आहे असे म्हटले. या अधिवेशनात शेतकऱ्यांसंबंधी खालील ठराव पास करण्यात आले होते. १) काँग्रेसच्या अंतर्गत शेतकरी व मजूर संघटना स्थापन केल्या जाव्यात.

1) जमीन महसुलात ५० टक्के कपात, जमिनीचा खंड ५० टक्क्यांनी कमी करावा.

२) शेतकऱ्यांच्या कर्जाची वसुली स्थगित ठेवावी.

3) शेतमजुरांना योग्य ते वेतन मिळावे.

४) सवलतीच्या दरात शेतकऱ्यांना कर्ज मिळावे.

५) शेतकरी वर्गाच्या समस्यांचा सर्वांगीण विचार याच अधिवेशनात प्रथम झाला हे विशेष होय.

**साने गुरुजी व शेतकरी आंदोलन:**

इ.स. १९३९ मध्ये पूर्व खानदेशात अतिवृष्टी झाली. पीक बुडाले. शेतकऱ्यांचा शेतसारा माफ व्हावा अशी मागणी साने गुरुजी यांनी केली. जळगाव जिल्हा कलेक्टर कचेरीवर हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा नेण्यासाठी त्यांनी हाक दिली. मोर्चाच्या प्रसारासाठी गुरुजी वाऱ्यासारखे फिरले. त्यांनी काही स्फूर्तिदायक गीते लिहिली व हीच गीते शेतकऱ्यांनी जळगाव कलेक्टर कचेरीवर काढलेल्या मोर्चाच्या वेळी म्हटली. खानदेशातील शेतकरी संघटित करण्याचा गुरुजींनी प्रयत्न केला. १३) सहकार चळवळ व शेतकरी चळवळ इ.स. १९२२-२८ या काळातही

मुंबई प्रांतातील शेतकरी सावकारी पाशातच अडकला होता. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी काही गावांची आर्थिक पाहणी केल्याचे जे अहवाल आहेत, त्यानुसार शेतकरी जे कर्ज घेत. त्यावर दरवर्षी दीड पट ते दुप्पट व्याज देत असत. काही शेतकरी सावकारांकडून धान्य (ज्वारी, तांदूळ) घेत व पीक आल्यानंतर दीड पट देत. विदर्भातील कापूस पिकवणारा शेतकरी दलाल व अडते यांच्याकडून पिळला जाई. शेतकऱ्यांच्या सावकारांकडून होणाऱ्या शोषणावर सहकारी चळवळीची वाढ व शेतकरी वर्गातील साक्षरता हा उपाय आहे याची जाणीव सरकारला झाली म्हणूनच सरकारने सहभागी संस्थांच्या वाढीकडे लक्ष दिले होते. सहकारी चळवळीत मुंबई प्रांत इतर प्रांतांच्या तुलनेत आघाडीवर होता. इ.स. १९२१-२२ मध्ये मुंबई प्रांतात ३४११ सहकारी सोसायट्या होत्या. त्यांची संख्या इ.स. १९२९ मध्ये ५७३४ झाली. सहकारी सोसायटीच्या सभासदसंख्येत अडीच पट तर भांडवलात ३ पट वाढ या काळात झाली. सहकारी पतपुरवठा संस्था वाढल्यामुळे सावकारांच्या गैरव्यवहारास फारसा आळा बसला नाही. या संस्थांची सभासदांकडील थकबाकी वाढत गेली. सहकार खात्यातील निबंधकांना थकबाकीदारांवर कारवाई करणे अशक्य होत गेले. सहकारी सोसायट्यांचे पदाधिकारी थकबाकीदार शेतकऱ्यांवर कार्यवाही करण्यास तयार नसत.

वि. रा. शिंदे व शेतकरी चळवळ मुंबई कायदे मंडळात सारावाढ व तुकडेबंदी बिल जेव्हा आले तेव्हा वि. रा. शिंदे यांनी त्यास प्रखर विरोध केला. २५ जुलै १९२८ रोजी पुणे येथे मुंबई इलाखा शेतकरी परिषद भरली तेव्हा अध्यक्षपदावरून दिलेल्या भाषणात त्यांनी तुकडे बिलास विरोध केला होता. या बिलामुळे शेतकरी आपल्या लहान लहान जमिनीच्या तुकड्यास मुकतील; त्यांच्याकडे रोख पैसा आला तरी तो कर्जबाजारी असल्याने पैसा राहणार नाही, मोठ्या शेतकऱ्यांचे जमिनीचे तुकडे छोट्या शेतकऱ्यांच्या तुकड्यास जोडावेत; तुकडे जोड करून मोठ्या प्रमाणात शेती करणे यात सामाजिक न्याय नाही असे त्यांनी म्हटले होते. सारावाढीचे बिलही शेतकऱ्यांवर अन्याय व जुलूम करणारे आहे; तोच शेतसारा देण्याचे त्राण शेतकऱ्यांत उरलेले नाही असे मत त्यांनी मांडले होते.

वि. रा. शिंदे यांनी शेतकरी परिषदेच्या व्यासपीठावरून फक्त विचार मांडले असे नव्हे तर खानदेश, नाशिक, अमरावती, नागपूर, पुणे, सातारा, नगर जिल्ह्यांच्या ग्रामीण भागातून त्यांनी शेतकऱ्यांच्या सभा घेतल्या. त्यांनी पुढील शेतकरी परिषदांचे अध्यक्षप भूषवले होते.

१) संस्थांनी शेतकरी परिषद, तेरदल (दक्षिण कोकण) ३ जून १९३२. २) शेतकरी परिषद, बोरगाव, वाळवा तालुका, सातारा जिल्हा ६ जून १९३२ ३ ) चांदवड तालुका शेतकरी परिषद, वडनेर १९ सप्टेंबर १९३१.

या सर्व परिषदांमधून तालुकानिहाय शेतकरी संघ व कामगार संघ निघाले पाहिजेत असा विचार त्यांनी मांडला. अमेरिकेतील शेतकरी नुसतेच कुणबी नाहीत तर जमीनदार, भांडवलदार आहेत. त्यांचा आपण आदर्श घ्यावा. अमेरिकन शेतकऱ्यांप्रमाणे आपल्या शेतकऱ्यासही शेतीमालाची किंमत ठरवता आली पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य किंमत मिळाली पाहिजे हा विचार त्यांनी बोलून दाखविला होता.

श्रीपतराव शिंदे, भगवंत पाळेकर, मुकुंदराव पाटील, दिनकरराव जवळकर यांचे शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी चिंतन श्रीपतराव शिंदे यांनी 'विजयी मराठा' पत्रातून शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांची चर्चा केली होती. शेतकरी वर्गाची संघटना स्थापन करण्याची गरज त्यांनी वारंवार प्रतिपादन केली होती. अमेरिका, स्वीडन था देशांप्रमाणे १०/१०, २०/२० शेतकऱ्यांचे संघ स्थापन करून सहकारी पद्धतीने शेती आमचे शेतकरी करतील तर त्यांचे दारिद्र्य संपेल असे त्यांनी म्हटले होते. शेतकऱ्यांच्या अधोगतीचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणाचा अभाव होय असे ते म्हणतात. अनेक लेखांतून त्यांनी सावकारशाहीवर हल्ला केला होता. गोरक्षणाकडे शेतकरी व सरकारनेही लक्ष द्याव असे त्यांनी आग्रहाने सांगितले. मुकुंदराव पाटील यांनी 'दीनमित्र' या पत्राच्या प्रारंभीच्या ७ अंकांतून (नोव्हेंबर, डिसेंबर १९११) शेतकऱ्यांची निकृष्ट स्थिती व ती घालवण्याचे उपाय ही ७ लेखांची लेखमाला लिहिली. शेतीची नवीन हत्यारे, शेतीची प्रदर्शने, शेती पुस्तके, शेती शिक्षण, शेती बी बियाणे पतपेढ्या, विहिरी बांधणे आदी उपायांद्वारे शेतीचे उत्पादन वाढेल असे त्यांनी लिहिले. धान्याचे भाव वाढवून व बांधून द्यावेत असा विचार त्यांनी मांडला. शेतकरी वर्ग हा राष्ट्राचे रक्त असल्याने ज्या देशात शेतकरी सुखी समाधानी आहे तोच देश टवटवीत दिसतो असे ते लिहितात. 'दीनमित्र' हे पत्र ५७ वर्षे चालले. शेकडो लेखांतून त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडल्यामुळे २० व्या शतकातील महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे ते प्रवक्ते होते, असे ख्यातनाम संशोधक गेल ओमव्हेट मत मांडतात. बडोदा येथून निघणाऱ्या 'जागृती'कार भगवंत पाळेकर यांनीही अनेक लेखांतून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. मुंबई प्रांतात शेतकऱ्यांच्या जमिनीची मालकी ब्राह्मण, मारवाडी व गुजर यांच्याकडे आहे यास कारण शेतकऱ्यांचे अज्ञान, चालीरीती, दारूबाजी व खर्चिक विवाह हेच आहे असे ते म्हणतात.

दिनकरराव जवळकर यांनी जे 'तेज' साप्ताहिक काढले होते त्यावर 'महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मुखपत्र' असे शब्द छापले जात. या साप्ताहिकात जवळकरांनी शेतकऱ्यांची बाजू घेणारे लेखन केले आहे. ४ जुलै १९३१ च्या 'तेज'च्या अंकात जमीनदार सावकारांचा अन्याय, जुलूम व पिळवणूक यांच्याविरुद्ध लढा देण्यासाठी 'शेतकरी सैन्य' उभे करावे अशी सूचना ते करतात. शेती हा राष्ट्रीय धंदा आणि शेतकरी हा राजकारणातील मुख्य व स्वतंत्र घटक झाल्याशिवाय हिंदी स्वराज्य खरे स्वराज्य नाही, असेही मत जवळकर मांडतात. १६) दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अन्नधान्य टंचाई: अन्नधान्याच्या दृष्टीने मुंबई प्रांत हा मुळातच तुटीचा प्रांत होता. युद्धामुळे ब्रह्मदेशातून होणारी तांदळाची आयात थांबली होती. लोकसंख्येतही वाढ होत होती. त्यात पुन्हा साठेबाजी व काळाबाजार यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन अन्नधान्याच्या किमतीही वाढल्या. त्यावर उपाय म्हणून सरकारतर्फे शिधावाटप केंद्रे सुरू केली गेली. शेतकऱ्यांकडून

सक्तीने धान्य वसुली सुरू केली गेली. धान्याच्या किमती, पुरवठा व वाटप यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात येऊ लागले. प्रांतिक सरकारांनी स्वस्त धान्याची दुकाने उघडली. शेतकऱ्यांनी खाद्यधान्याची पिकेच घ्यावीत याबबत सरकारतर्फे आदेश देण्यात येऊ लागले.

१) **मुंबई प्रांतातील कूळ कायदा :** इ.स. १९३९ मध्ये पहिल्या खेर मंत्रिमंडळाने हा कूळ कायदा मंजूर केला, पण त्याची अंमलबजावणी इ.स. १९४६ पासून सुरू झाली. खंड देण्याच्या बोलीवर ६ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ जमीन कसणाऱ्या कुळांना १० वर्षांच्या काळापुरते संरक्षण मिळाले. इ.स. १९४८ मध्ये कूळ कायदा दुरुस्त केला गेला व १० वर्षाची कालमर्यादा काढून टाकण्यात आली. जमीन कसणाऱ्या कुळाला जमीन मालक होण्याची संधी दिली गेली.इ.स.१९४९ मध्ये रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांतील खोती पद्धती नष्ट करण्याबाबतचा कायदा मंजूर करण्यात आला. इ.स. १९४७ मध्ये मुंबई प्रांतात तुकडेबंदी कायदा मंजूर झाला.
**सावकारीवर नियंत्रण व सहकारी चळवळीच्या विकासावर भर :-** शेतकऱ्यांची सावकारांच्या मगरमिठीतून मुक्तता करण्यासाठी मुंबई सरकारने इ.स. १९४७ मध्ये सावकारी नियंत्रण कायद्यात दुरुस्त्या केल्या. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी सोसायट्यांच्या उभारणीवर भर देण्यात आला.

शेतकरी कामगार पक्ष व शेतकरी चळवळ शंकरराव मोरे व केशवराव जेधे हे काँग्रेसमध्ये असले तरी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांचा कारभार शेतकरी व कामगार वर्गाच्या विरोधी आहे व भांडवलशाहीधार्जिणा आहे अशी त्यांची खात्री झाली. खेर मंत्रिमंडळ व्यापाऱ्यांचे आहे असे ते म्हणत. इ.स.१९४६ मध्ये काँग्रेसअंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन झाला. तो स्थापन करण्यात जेधे, मोरे, भाऊसाहेब राऊत, के. डी. पाटील, यशवंतराव चव्हाण, नाना पाटील, दत्ता देशमुख, पी. के. सावंत, तुळशीदास जाधव, आचार्य अत्रे, रामभाऊ नलावडे यांचा पुढाकार होता. पण काँग्रेसअंतर्गत कोणतेही उपपक्ष असू नयेत अशी स्पष्ट भूमिका जेव्हा अ. भा. काँग्रेस कार्यकारिणीने घेतली. तेव्हा २६ एप्रिल १९४८ रोजी स्वतंत्र पक्ष म्हणून शे. का. पक्ष जन्मास आला. पक्षाचे पहिले अधिवेशन सोलापूर येथे झाले. शे. का. पक्षाच्या वाढीसाठी शंकरराव मोरे, नाना पाटील, तुळशीदास जाधव, केशवराव जेधे इत्यादींनी खूप परिश्रम घेतले. 'जनसत्ता' या नावाचे एक साप्ताहिक या पक्षाचे मुखपत्र म्हणून निघे. नाशिक जिल्ह्यात दाभाडी येथे इ.स. १९५० मध्ये भरलेल्या पक्षाच्या दुसऱ्या अधिवेशनात पक्षान दाभाडी प्रबंध स्वीकारला. त्यात पक्षाचे ध्येयधोरण विस्ताराने मांडले आहे. या पक्षातील ज्येष्ठ नेत्यांत तीव्र वैचारिक मतभेद निर्माण झाले. शेवटी जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, खाडिलकर वगैरे सर्वच या पक्षातून बाहेर पडले व काँग्रेसमध्ये दाखल झाले. इ.स. १९५२, १९५७ च्या निवडणुकीत पक्षाने बऱ्यापैकी यश मिळवले होते. काँग्रेसच्या खालोखाल हाच पक्ष महाराष्ट्रात लोकप्रिय होता. एक समर्थ विरोधी पक्ष अशी या पक्षाची ओळख प्रारंभीच्या १०-१२ वर्षाच्या काळात झाली होती. या पक्षाने शेतकऱ्यांचे प्रश्न विधानसभेत व बाहेर मांडले. लेव्ही पद्धत, धान्य नियंत्रण पद्धतीवर टीका करण्याचे काम या पक्षाच्या आमदारांनी केले. कुळांना संरक्षण द्यावे अशी मागणी केली. शेतीमालास किफायतशीर भाव मिळाला पाहिजे असा विचार मांडला. रोजगार हमी योजना, कापूस एकाधिकार योजना या पक्षांच्या आमदारांनीच सुचवलेल्या होत्या. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा प्रवक्ता म्हणून या पक्षाकडे कित्येक वर्षे पाहिले गेले.

महाराष्ट्रातील कामगार चळवळ (इ.स. १८१८-१९६०)
ब्रिटिशांच्या राजवटीत भारतात कापड, लोखंड, पोलाद, कोळसा, रसायने, सिमेंट,
ताग, साखर इत्यादी उद्योगांचा विकास होत गेला. हा उद्योग विकास प्रामुख्याने बंगाल
मुंबई या दोन प्रांतांतच झाला. या उद्योग विकासाला ब्रिटिशांचे धोरण प्रामुख्याने कारणीभूत होते. १) ब्रिटिश भांडवलदारांनी आपले भांडवल भारतातील विविध उद्योगांत गुंतवले. २) ३) ४) कमी वेतनावर काम करण्यास तयार

असणारा मजुरांचा वर्ग मोठ्या प्रमाणात उपलब्ध होता. खनिज संपत्तीचे साठे भारतात होते. महाराष्ट्रात पूर्व विदर्भात कोळशाचे साठे होते.

चहा, कॉफी, नीळ, ताग, रबर या शेती उद्योगाशी संबंधित असणाऱ्या उद्योगधंद्यांकडेही ब्रिटिशांनी लक्ष दिले होते.

५) उद्योगधंद्यांसाठी आवश्यक असणारा कच्चा माल स्वस्त व मोठ्या प्रमाणात भारतात मिळत होता.

६) रेल्वेच्या विकासामुळे उद्योगधंद्यांच्या विकासाला हातभार लागला.

. १८५७ - २०० मैल, इ.स. १९१४ - ३४००० मैल

इ. स रेल्वेमार्ग बांधणीचे कामही ब्रिटिश भांडवलदारांकडेच असल्याने त्यातील नफा त्यांच्याच

हातात जाई. पहिला रेल्वेमार्ग मुंबई ते ठाणे हा इ.स. १८५३ मध्ये टाकला गेला.

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास /५४०

गिरणी कामगारांपुढील समस्या :-

१) मुंबई शहर व गुजरातमध्ये कापड उद्योगाची प्रचंड भरभराट झाली. कापड गिरण्यांत नोकऱ्यांचे प्रमाण सतत वाढत होते. इ.स.१८७५ ते १८९० या १५ वर्षात नोकऱ्यांत ३३.६ टक्के वाढ झाली; पण त्या तुलनेत नोकरांच्या वेतनात मात्र वाढ होत नव्हती. मालक देईल तेवढाच पगार मुकाट्याने घ्यावा लागे.

२) गिरण्यांतून स्त्रियांना कामावर लावले जाई. गिरण्यात स्त्रियांच्या नोकरीचे प्रमाण

इ.स. १८८४ मध्ये २२.२ टक्के होते. ३) गिरण्यांमध्येही अस्पृश्यता पाळली जाई. विविध खात्यांत अस्पृश्यांना ठेवले जात नसे; पण झाडूवाल्याचे काम अस्पृश्यांकडेच दिले जाई.

४) गिरण्यांना साप्ताहिक सुटी नसे. हिंदूंच्या काही सणांच्या दिवशी गिरण्या बंद असत. मशीनच्या दुरुस्तीच्या दिवशी (महिन्यातून ३-४ वेळेस) कामगारांना हजर राहावे लागे; पण प्रत्यक्षात उत्पादन होत नसल्याने त्यांना त्या दिवसांचे वेतन मिळत नसे. ५) गिरण्यांतील कामाचे तास निश्चित नव्हते. उन्हाळ्यात १२-१४ तास गिरणीतील कामगारांना काम करावे लागे. दुपारी फक्त १५ ते २० मिनिटेच काम बंद असे. दुपारच्या सुटीची वेळही निश्चित नव्हती. कामावर येण्यास ५-१० मिनिटे उशीर झाला तर त्यास दंड केला जाई. आकस्मित रजा मिळत नसे.

६) विविध कारणांसाठी दंड व पगार कपातीची टांगती तलवार कामगारांच्या डोक्यावर असे. उदा. परवानगीशिवाय गैरहजेरी, काम कमी होणे अथवा त्याचा दर्जा कमी असणे. प्रारंभीच्या काळात 'जॉबर्स'चे वर्चस्व असल्याने ते परिचित लोकांना व गावाकडील

७) लोकांनाच काम देत. हे 'जॉबर्स' मजुरांकडून पैसा घेऊन त्यांचे शोषणही करत. ८) कामगारांना राहण्यासाठी कोंदट घरे असत. शिक्षणाच्या सोयी (मुलांच्या) नव्हत्या. ९) बालकामगारांना कामावर लावले जाई. त्यांना वेतन अत्यंत अल्प मिळत असे. तेही

वेळेवर मिळत नसे. त्यासाठी वारंवार विनंती करावी लागे. १०) स्त्री-पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन नव्हते.

E

११) कामगारांच्या तांत्रिक प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष होते. स्वच्छता गृहाची सुविधा नसे. १२) गिरण्यांतील कोंदट हवा, धूळ व प्रचंड उष्णतामान यांचा कामगारांच्या आरोग्यावर

परिणाम होई. गिरण्यांत शौचकुपे फारच अपुरी असत.

१३) प्रत्येक गिरणीचे कामासंबंधीचे नियमही भिन्न होते. पगार नियमित होत नसत. दोन महिन्याला केव्हा तरी तो होत असे. त्यामुळे सावकार कामगारांचे शोषण करीत. १९ व्या शतकाच्या शेवटी भारतात कामगार चळवळीस प्रारंभ झाला. अनेक विचारवंत, पत्रकार, समाजसेवक गिरणी कामगारांच्या प्रश्नांत लक्ष घालू लागले. अर्ज, विनंत्या, निवेदने देऊ लागले. खालील वृत्तपत्रांनी गिरणी कामगारांच्या प्रश्नांविषयी लिखाण केलेले दिसते. १) नेटिव्ह ओपिनियन, २) रोफ्त गोफ्तर, ३) इंदुप्रकाश, ४) दीनबंधू, ५) सुबोध पत्रिका.

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास /५४१

इ.स. १८८१ चा फॅक्टरी ॲक्ट :-

पहिल्या फॅक्टरी कमिशनचे अध्यक्ष अबुर्ट नॉट होते. इ.स. १८५१ मध्ये मुंबई प्रांतात
कावसजी दावर यांनी 'स्पीनिंग व विव्हिंग कंपनी' या नावाची पहिली कापड गिरणी सुरु झाली, तर माणेकजी पेटीट यांनी दुसरी जिनिंग इ.स. १८५४ मध्ये सुरू केली. त्यानंतर मंगलदास नथूबाई, दिनशा पेटिट, बोमनजी वाडिया व केशवजी नाईक यांनी आपापल्या मालकीच्या गिरण्या काढल्या. मुंबई इलाख्यातील कापड गिरण्याची मालकी इंग्रज, पारशी, भाटिया व खोजा वगैरे बिगर मराठी भाषिक माणसाच्या हाती होती तर गिरण्यामध्ये कामगार मराठी भाषिक होते. इ.स. १८७७ मध्ये नागपूर येथे प्रथम एम्प्रेस मिल ही काप गिरणी सर जमशेटजी टाटा यांनी काढली. इ.स. १८७५ मध्ये मुंबईत ४१, कलकत्त्यात ५, कानपुरात ३, मद्रासमध्ये २, हैदराबाद, इंदूर व नागपूर येथे प्रत्येकी एक कापड गिरणी होती. प्रारंभी कापड उद्योग मुंबई, सुरत येथेच केंद्रित झाला होता कारण तेथील सागरी आर्द्र हवामान, इ.स.१८७५ मध्ये मुंबईच्या प्रमुख गिरणी मालकांनी एकत्र येऊन 'Bombay Mill Owners Association' ही संघटना स्थापन केली. इ.स.१८७९ मध्ये मुंबई सरकार पुढे फॅक्टरी बिल मंजुरीसाठी आले असता त्यास या संघटनेने विरोध दर्शविला होता. इ.स. १८८ ला फॅक्टरी अॅक्ट पास झाला. त्यातील तरतुदी अत्यंत सौम्य व मर्यादित स्वरूपाच्या होत्या १०० पेक्षा जास्त कामगार संख्या असलेल्या गिरण्यांनाच तो कायदा लागू होता. ७ ते १२ वर्षांच्या आतील मुलांना कामावर लावू नये, ९ तासांपेक्षा जास्त वेळ मुलांना काम देऊ नये व धोकादायक यंत्राभोवती तारेचे कुंपण असावे आदी त्या कायद्यात तरतुदी होत्या. नारायण लोखंडे : नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कुशल नेतृत्वाखाली गिरणी कामगार आपल्या हक्कांसाठी एकत्र येत होते. नारायण लोखंडे यांनी इ.स. १८८१ च्या फॅक्टरी अॅक्टमधील तरतुदींवर मोठ्या प्रमाणात टीका केली. कामगारांच्या हितासाठी मालकांना आव्हान देण्याऐवजी कामगारांना संघटित करण्याचे कार्य त्यांनी केले. गिरणी
कामगारांच्या बैठका घेतल्या व 'Bombay Mill Hands Association' ही देशातील
पहिली कामगार संघटना त्यांनी स्थापन केली (इ.स. १८८४). २३ सप्टेंबर १८८४ रोजी त्यांनी मुंबईच्या परळ भागात कामगारांची पहिली ऐतिहासिक सभा भरवली होती. देशी वृत्तपत्रांनी या सभेची फारशी दखल घेतली नाही, पण Times of India सारख्या मातब्बर पत्रांनी या सभेचा विस्तृत वृत्तांत छापला होता. या सभेला ४००० कामगार उपस्थित होते. याच सभेत त्यांनी कामगारांच्या साप्ताहिक सुटीची मागणी केली. कामगारांना नियमित पगार मिळाले पाहिजेत, नोकरीवरून काढण्यापूर्वी १५ दिवस अगोदर कामगारांना नोटीस द्यावी अशी मागणी केली. १५ ऑक्टोबर १८८४ रोजी त्यांनी ५५०० कामगारांच्या सह्यांचे एक निवेदन फॅक्टरी कमिशनच्या अध्यक्षाला दिले होते. त्यात आठवड्यास सुटी, दुपारी अर्धा तास सुटी, पगार १५ तारखेपर्यंत देणे, अपघातात जखमी झालेल्या कामगाराला बरा होईपर्यंत पूर्ण वेतन व मृत्यू आल्या।

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास /५४२

कुटुंबीयांना पेन्शन आदी मागण्या करण्यात आल्या होत्या. लोखंडे यांनी मुंबई सरकारकडे कामगारांच्या मागण्यांच्या संदर्भात वारंवार निवेदने पाठवली, स्मरणपत्रे पाठविली. साप्ताहिक सुटीसाठी प्रयत्न चालू असताना गिरणी मालक संघाने आठवड्यातून दोन दिवस गिरणी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. 'दीनबंधू'च्या ११ ऑगस्ट १८८५ च्या अंकात 'आमच्या इंग्रज सरकारच्या राज्यात गिरण्यांच्या मालकांची झोटिंगशाही' हा अग्रलेख त्यांनी लिहिला. २४ एप्रिल १८९० रोजी लोखंडे यांनी मुंबईत जी सभा बोलावली त्यास १०,००० कामगार उपस्थित होते. शेवटी १० जून १८९० रोजी गिरणी मालकांनी रविवारची सुटी
देण्याचे मान्य केले. फॅक्टरी अॅक्ट (इ.स. १८९१) :-

कामगारविषयक प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठी सरकारने एक लेबर कमिशन नेमले. या कमिशनने विविध कामगार, कामगारांच्या व गिरणी मालकांच्या संघटनांची मते जाणून घेतली. इ.स.१८८१ च्या कायद्यात सुधारणा करून नवा फॅक्टरी अॅक्ट इ.स. १८९१ मध्ये मंजूर करण्यात आला. या कायद्याची अंमलबजावणी १ जानेवारी १८९२ पासून झाली. या कायद्यात खालील तरतुदी होत्या.

१) ५० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार जेथे किमान चार महिने काम करतात त्या ठिकाणाला 'फॅक्टरी' म्हणावे.

२) स्त्रियांचे कामाचे तास ११ असावेत व त्यांना दुपारी दीड तास सुटी असावी. ३) बालकामगारांना (९ ते १४) चे कामाचे तास साडेसहा तासांपेक्षा जास्त असू नयेत.

४)

साप्ताहिक सुटी असावी.

५) गिरण्यांत स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाश व हवा यासंबंधीचे नियम करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासनास असावा. प्रस्तुत फॅक्टरी ॲक्टची अंमलबजावणी होत नाही म्हणून लोखंडे यांनी 'दीनबंधू' या पत्रातून सतत पाठपुरावा केला. इ.स. १८९२ मध्ये अनेक गिरण्यांत संप झाले; परंतु गिरण्यांचे मालक व पोलिस अधिकारी यांनी संगनमत करून ते संप चिरडून टाकले. इ.स.१८९५ मध्ये लोखंडे यांना 'रावबहादूर' हा किताब ब्रिटिशांनी दिला होता. ९ फेब्रुवारी १८९७ रोजी ठाणे येथे त्यांचे प्लेगच्या आजाराने निधन झाले. जोतिराव फुले यांना 'महात्मा' ही पदवी देण्याचा कार्यक्रम लोखंडे यांनीच आखला होता. जोतिरावांच्या मृत्यूसमयी त्यांचे जे सहकारी हजर होते त्यापैकी लोखंडे हे एक होत.

१२ फेब्रुवारी १८९३ च्या 'दीनबंधू'त त्यांनी कामगार कल्याणाच्या काही महत्त्वपूर्ण श्री सूचना केल्या होत्या. लोखंडे यांनी १ एप्रिल, ३ जून, ११ ऑगस्ट १८९४ च्या दीनबंधूत कामगारांची बाजू घेऊन गिरणीमालकांच्या झोटिंगशाहीविरुद्ध टीका केली होती. मुंबई शहरातील स्मॉल कॉज कोर्टात कामगारांना न्याय मिळत नाही तर तो मारवाडी व लुच्चा लोकांना मिळते असे लोखंडे म्हणत.

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास /५४३

इ.स. १८९० मध्ये लोखंडे यांना जे. पी. (जस्टिस ऑफ पीस) ही पदवी मिळाली होती. इ.स. १८९३-९४ मध्ये जे हिंदू-मुस्लिम दंगे झाले ते मिटवण्यातही लोखंडे यांची भूमिका महत्त्वाची होती. लोखंडे यांच्या मृत्यूनंतर भिवाजी नरे यांनी व मराठा एकेच्छू सभेने गिरणी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले.

मुंबई इलाख्यात मुंबई शहरात ६७, अहमदाबाद १४, बडोदा ३, सुरत ३, ठाणे १ अशा कापड गिरण्या होत्या. खेडा, जळगाव, नाशिक, पुणे, सोलापूर, बेळगाव, धारवाड या ठिकाणी प्रत्येक १ अशा एकूण ९६ गिरण्या होत्या. ही आकडेवारी इ.स. १८९५ ची आहे. 'दीनबंधू' या त्यावेळेसच्या साप्ताहिकात दिली आहे. कामावर असताना इ.स. १८९५ मध्ये १९ कामगार मृत्यू पावले व १०४५ जखमी झाले होते. म्हणून फॅक्टरी इन्सपेक्टरची नेमणूक करावी अशी मागणी लोखंडे यांनी केली होती. इ.स. १८९५ मध्ये मुंबई प्रांतात गिरण्यात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या २५,६८८ होती, तर बालकामगार म्हणून काम करणाऱ्या मुला-मुलींची एकूण संख्या ६४२४ होती.

इ.स. १८९० ते १९१७ या काळात वेगवेगळ्या औद्योगिक केंद्रांत कामगारांचे संपही बरेच झाले; पण त्यातून कायमस्वरूपी अशी संघटना निर्माण झाली नाही. त्यावेळच्या संपांपैकी एक संप म्हणजे इ.स.१९०८ चा होय. इ.स. १९०८ मध्ये टिळकांना जेव्हा राजद्रोहाची शिक्षा झाली होती तेव्हा त्याच्या निषेधार्थ मुंबईतील गिरणी कामगारांनी ६ दिवस संप केला होता. ही घटना कामगार वर्गातील राजकीय जाणिवेची साक्ष पटविते. इ.स. १९०९ मध्ये फॅक्टरी कमिशनची स्थापना झाली. इ.स. १९११ मधील इंडियन फॅक्टरी ॲक्टनुसा पुरुष कामगारांचे प्रतिदिन कामाचे तास १२ तर स्त्रिया व बालकामगारांचे कामाचे तास ११ व ७ एवढे निश्चित करण्यात आले. इ.स. १९२२ मध्ये इंडियन फॅक्टरी ॲक्टनुसार कामगारांचे कामांचे तास आणखी कमी करण्यात आले.

**मुंबईत कामगारांचे स्थलांतर :-**

मुंबईत गिरणी कामगारांच्या संख्येत सतत वाढ होताना दिसते. याचे कारण कोकण तसेच अहमदनगर, पुणे, सोलापूर वगैरे भागात दुष्काळी स्थिती असे त्या भागात शेतीची कामे हंगामी असल्याने वर्षभर रोजगार मिळत नसे. रोजगाराच्या आशेने खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर विशेषतः २० शतकाच्या प्रारंभीच्या दोन दशकांत झालेले दिसते. एकट्या रत्नागिरी जिल्ह्यातून झालेले स्थलांतर पुढील आकडेवारीतून स्पष्ट होते.

**मुंबईतील एकूण कामगार :-**

इ.स. १८९१ मध्ये १,२०,००० होते. त्यापैकी रत्नागिरी जिल्ह्यातील कामगार २८००० होते. इ.स.१९२१ मध्ये १,३४,००० होते. त्यापैकी रत्नागिरी जिल्ह्यातीस कामगार ५४००० होते. इ.स. १९१८ साली हाच आकडा ५८००० एवढा

होता. स्थलांतर करणारांमध्ये मराठा-कुणबी या जाती गटाबरोबरच महार व तत्सम जाबींच्या माणसांचा भरणा होता. हे स्थलांतरित मुंबईत गिरणी कामगार, घरगडी, पोलिस, गोदी कामगार म्हणूही काम करत. कोकणातून स्थलांतर करणाऱ्या कामगारांची संख्या जास्त होती. कामगार हितवर्धक सभा इ.स. १९१० मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेने पुढील मागण्या केल्या.

१) १२ तास कामाचा दिवस असावा.

२) कामावर असताना दुखापत झाल्यास नुकसानभरपाई मिळावी.

३) कामगारांच्या मुलांची शिक्षणाची सोय व्हावी.

४) कामगारांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली जावी.

या संघटनेच्या वतीने 'कामगार समाचार' हे साप्ताहिक चालविले होते. या संघटनेने मालक-मजूर तंटे सोडविण्यावर भर दिला. भिवाजी नरे यांनी बाबासाहेब बोले व बॅ. हरिश्चंद्र तालचेरकर त्यांच्या मदतीने ही संघटना स्थापन केली. या संघटनेने अनेक गिरण्यांतील संप मिटवून कामगारांचे थकलेले पगार मिळवून दिले. इ.स. १९१७ मध्ये ४७ संप, इ.स. १९१८ मध्ये ६१, १९१९ ला १८ संप झाले, परंतु त्यातील काही संपांची व्याप्ती फार मोठी होती. इ.स.१९१९ च्या ९ ते २५ जानेवारी या काळात मुंबई कापड गिरणीतील दीड लाख कामगारांनी संप केला होता. हा संप उत्स्फूर्त होता. या संपामागे विशिष्ट कामगार संघटना व नेतृत्व नव्हते. इ.स. १९२० ला ६३ संप झाले. या संपातून नवीन नेतृत्व उदयास आले. मुंबई कामगार संघटनेत प्रामुख्याने जे नेते उदयास आले त्यांची नावे - सीताराम बोले, हरिश्चंद्र तालचेरकर, एस. बी. गावडे, डी. जी. पंडित. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी भारतातील २,८२,००० कामगारापैकी एकट्या मुंबईत १,२५,००० कामगार होते. देशातील २६२ गिरण्यापैकी ८३ मुंबई शहरातच होत्या. बहुसंख्य कामगार मराठी भाषिक असले तरी गिरणी मालक पारशी, भाटिया, खोजा, ज्यू अथवा इंग्रज होते. (ही आकडेवारी १९१८ च्या दरम्यानची आहे.) १९१९ च्या अखेरीस मुंबई कामगार संघटनेत प्रामुख्याने मराठी नेतृत्व उदयास आले. सीताराम बोले, हरिश्चंद्र तालचेरकर, एस. बी. गावडे, डी. जी. पंडित ही काही कामगार नेत्यांची नावे आहेत.

सेंच्युरी मिलमध्ये मुंबईच्या कामगारांनी २५ टक्के पगारवाढ व १ महिन्याचा जादा पगार यासाठी संप केला. एकूण दीड लक्ष कामगार संपावर गेले होते. गिरणीच्या मालमत्तेची मोडतोड झाली. कामगार हितवर्धक सभेने या संपात कामगारांना शांततेचे आवाहन केले व या संपात या सभेने यशस्वी मध्यस्थी केली. प्रस्तुत सभेने १४ डिसेंबर १९१९ ला मुंबईतील कामगारांची परिषद भरवली. या परिषदेने पुढील मागण्या केल्या गेल्या. १) गिरणीतील कामाचे तास ८ असावेत.

१) दुपारची सुटी १ तास असावी.

२) बालकामगार कामावर घेऊ नयेत.

३) नंतर दारू दुकाने बंद ठेवावीत.

४ ) कामगारांसाठी विश्रांतिगृहे व वाचनालये असावीत.

५) कामगारांची घरे व गिरण्यांच्या भागातील दारू दुकानांची संख्या कमी करून रात्री-इ.स. १९२० मध्ये देशातल्या विविध औद्योगिक शहरांत औद्योगिक शांतता पसरली

मुंबई, पुणे, सोलापूर, बार्शी, हिंगणघाट, नागपूर वगैरे ठिकाणचे कापड गिरणी कामगार संपावर गेले होते व त्यांना आपल्या काही मागण्या पदरात पाडून घेण्यात यश आले होते. १ जानेवारी १९२० रोजी जेकब ससून गिरणीतील ४००० हून जास्त कामगारांनी बोनस मिळावा या मागणीसाठी संप पुकारला व त्याच दिवशी संध्याकाळपर्यंत २५ गिरण्यांतील ४०,००० कामगार त्यात सामील झाले. मुंबई कामगार समिती ही संघटना न्या. नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झाली. या समितीने पुढील मागण्या केल्या.

**कामाचे तास कमी करावेत.**

१) पगारात ५० टक्के वाढ करावी. ३) दररोज दुपारी एक तास सुटी असावी ४) दर महिन्याचा पगार १५ तारखेला मिळावा

५) अपघात झाल्यास नुकसानभरपाई द्यावी

६) संपकाळातील वेतन दिले जावे.

यापैकी कामाचे तास कमी करण्याची मागणी विचारात घ्यायला गिरणी मालक तयार झाले, मात्र बाकीच्या सर्व मागण्या त्यांनी फेटाळून लावल्या. याही संपात गिरणी कामगारांनी दगडफेक केली, दुकानांची लूट केली. पोलिस गोळीबारात एक कामगार ठार झाला. कामगार समितीच्या नेत्यांनी समेटासाठी पुन्हा गव्हर्नरकडे धाव घेतली. गव्हर्नरनी मध्यस्थी केल्यामुळे कामगारांचे कामाचे तास १२ ऐवजी १० करण्यात आले. अपघाताबद्दल नुकसानभरपाई व वैद्यकीय मदत देण्याचे तसेच महागाई भत्ता ३५ टक्क्यांऐवजी ५० टक्के देण्याचे मालकांनी मान्य केले. कापड गिरण्या पूर्ववत सुरू झाल्या. पहिल्या महायुद्धाच्या शेवटी भारतातील २,८२,००० कामगारांपैकी एकट्या मुंबईतच १,२५,००० कामगार होते. देशातील २६२ गिरण्यापैकी ८३ गिरण्या मुंबई शहरातच होत्या. बहुतेक कामगार मराठी भाषिक होते.

ऑगस्ट ते ऑक्टोबर १९२० या ३ महिन्यांत मुंबईत जी आ. पी. रेल्वे कामगार, ट्रामचे चालक व कंडक्टर गॅस कंपनी व तेल कंपनी यांतील कामगार, महापालिकेतील सफाई कामगार यांनी संप केले. मुंबई पालिकेने सफाई कामगारांना २० रु. ऐवजी २४ रु. दरमहा पगार तसेच रविवारी व सणाच्या दिवशी सुटी देण्याचे मान्य केले. सफाई कामगारांचे नेतृत्व करण्याची व वेळप्रसंगी तुरुंगात जाण्याची तयारी सेनापती बापट यांनी दाखवली होती. सफाई कामगार मित्रमंडळ त्यांनी स्थापन केले होते. मुंबईत ऑल इंडिया ट्रेड युनियनची स्थापना ( इ.स. १९२०) :- ७ जुलै १९२० रोजी मुंबईत (परळ) येथे भरलेल्या कामगारांच्या जाहीर सभेत ही संघटना स्थापन झाली. ३१ ऑक्टोबर १९२० रोजी मुंबईत एंपायर नाट्यगृहात लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली All India Trade Union Congress चे पहिले अधिवेशन भरले. त्यास मोतीलाल नेहरू, ॲनी बेझंट, विठ्ठलभाई पटेल, महम्मद अली जिना या नेत्यांखेरीज कर्नल वेजवूड हे इंग्लंडमधील मजूर पक्षाचे नेतेही हजर होते. विशेष म्हणजे या अधिवेशनास व्यापारी व उद्योगपती यांची उपस्थिती होती. जागूताई जोशी. अवंतिका गोखले, बी. पी. वाडिया, एफ. नरीमन, सी. एफ. ॲन्ड्रूज हेही हजर होते. वागताध्यक्ष जोसेफ बॅप्टिस्टा होते. त्यांनी भांडवलदार वर्ग मजुरांचे कसे शोषण करतो हे सांगितले पण भांडवलशाही नष्ट केल्याशिवाय हे शोषण थांबणार नाही असे मात्र नाही. लाला लजपतराय यांनी कामगारांनी 'संघटित व्हा, चळवळ करा आणि लोकांना शिकवा' असे आवाहन केले. All India Trade Union ने एकूण ६४ कामगार संघटना व १,४०,८५४ एवढे कामगार संलग्न करून घेतले गेले. या अधिवेशनात कामगारांना मताधिकार द्यावा, विधिमंडळात व्यापाऱ्यांचा व कामगारांचा जसा प्रतिनिधी असतो तसाच कामगारांचा प्रतिनिधी निवडला जावा अशी मागणी करणारा ठराव पास केला.

इ.स. १९२१ ते १९३६ या काळात मुंबईतील कापड उद्योगात पीछेहाट झाल्याचे दिसते. इ.स. १९१८ मध्ये मुंबईत ७९ कापड गिरण्या होत्या. इ.स. १९३१ पर्यंत ६ कापड गिरण्या बंद पडल्याने ती संख्या ७३ वर आली. अहमदाबादेतील गिरण्यांत मात्र १४ ची भर पडली. सोलापूरमध्ये एकूण ५ कापड गिरण्या होत्या व तेथे १८००० कामगार होते. मुंबईतील कामगारांना ३८ रु. दरमहा मिळत तर सोलापुरातील गिरणी कामगारांना २४ रु. मिळत. इ.स.१९२०-२१ नंतर मुंबई व सोलापुरातील कापड गिरण्यांना जपानच्या कापड उद्योगाशी स्पर्धा करावी लागली. त्यामुळे कापड उद्योग अडचणीत आला. १९३८ च्या बालमजुरीच्या कायद्यानुसार रेल्वे व गोदीमध्ये १५ वर्षाखालील मुलांना काम करण्यास बंदी घालण्यात आली.

इ.स. १९२३ मध्ये श्रीपाद अमृत डांगे व केशवराव जोगळेकर यांनी Hindustan Labour Socialist Party या नावाचा पक्ष स्थापन केला; पण तो नावापुरताच राहिला. ३१ जानेवारी १९२४ पर्यंत मुंबईतील ७३ गिरण्यांतील कामगार संपावर गेले. बोनसच्या मागणीसाठी हा संप होता. प्रत्यक्षात गिरणी मालकांना नफा होत नव्हता. यावेळी कामगारांनी संप मागे घेऊन ते हळूहळू कामावर हजर झाले. कापड उद्योगाखालोखाल मुंबई प्रांतातील इंजिनियरिंग उद्योगात इ.स. १९३९ मध्ये ३९९ कारखान्यात ३०,९२५ कामगार होते. इ.स.१९४७ मध्ये ही संख्या ६४७ कारखान्यांत ५३,२९८ कामगार अशी होती. आर्थिक मंदी (इ.स. १९२९-३२) व तिचा मुंबई गिरणी कामगारांवरील परिणामः - इ.स.१९२९-३२ या काळातील जागतिक मंदीचा परिणाम मुंबई व अहमदाबाद शहरातील कापड गिरणी कामगारांवरही झाला. इ.स.

१९३१ मध्ये मुंबईत ७३ कापड गिरण्या होत्या, तर इ.स. १९३४ मध्ये ती संख्या ९६००० साली आर्थिक मंदीमुळे कापडाला मागणी नसल्याने विक्री न झाल्याने कापड गिरणीत काम करणारांच्या कामगारांच्या पगारात ४० टक्के कपात केली गेली. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत गांधीजींनी विदेशी कापडावर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतल्यामुळे गिरणी मालकांचाच फायदा झाला व त्यांनी काँग्रेसला आर्थिक सहकार्य केले.

**Bombay Textile Labour Union:-**

२३ जानेवारी १९२६ रोजी ही संघटना स्थापन झाली. ना. म. जोशी या संघटनेचे अवंतिका गोखले, बी. पी. वाडिया, एफ. नरीमन, सी. एफ. ॲन्ड्रूज हेही हजर होते. वागताध्यक्ष जोसेफ बॅप्टिस्टा होते. त्यांनी भांडवलदार वर्ग मजुरांचे कसे शोषण करतो हे सांगितले पण भांडवलशाही नष्ट केल्याशिवाय हे शोषण थांबणार नाही असे मात्र नाही. लाला लजपतराय यांनी कामगारांनी 'संघटित व्हा, चळवळ करा आणि लोकांना शिकवा' असे आवाहन केले. All India Trade Union ने एकूण ६४ कामगार संघटना व १,४०,८५४ एवढे कामगार संलग्न करून घेतले गेले. या अधिवेशनात कामगारांना मताधिकार द्यावा, विधिमंडळात व्यापाऱ्यांचा व कामगारांचा जसा प्रतिनिधी असतो तसाच कामगारांचा प्रतिनिधी निवडला जावा अशी मागणी करणारा ठराव पास केला.

इ.स. १९२१ ते १९३६ या काळात मुंबईतील कापड उद्योगात पीछेहाट झाल्याचे दिसते. इ.स. १९१८ मध्ये मुंबईत ७९ कापड गिरण्या होत्या. इ.स. १९३१ पर्यंत ६ कापड गिरण्या बंद पडल्याने ती संख्या ७३ वर आली. अहमदाबादेतील गिरण्यांत मात्र १४ ची भर पडली. सोलापूरमध्ये एकूण ५ कापड गिरण्या होत्या व तेथे १८००० कामगार होते. मुंबईतील कामगारांना ३८ रु. दरमहा मिळत तर सोलापुरातील गिरणी कामगारांना २४ रु. मिळत. इ.स.१९२०-२१ नंतर मुंबई व सोलापुरातील कापड गिरण्यांना जपानच्या कापड उद्योगाशी स्पर्धा करावी लागली. त्यामुळे कापड उद्योग अडचणीत आला. १९३८ च्या बालमजुरीच्या कायद्यानुसार रेल्वे व गोदीमध्ये १५ वर्षाखालील मुलांना काम करण्यास बंदी घालण्यात आली.

इ.स. १९२३ मध्ये श्रीपाद अमृत डांगे व केशवराव जोगळेकर यांनी Hindustan Labour Socialist Party या नावाचा पक्ष स्थापन केला; पण तो नावापुरताच राहिला. ३१ जानेवारी १९२४ पर्यंत मुंबईतील ७३ गिरण्यांतील कामगार संपावर गेले. बोनसच्या मागणीसाठी हा संप होता. प्रत्यक्षात गिरणी मालकांना नफा होत नव्हता. यावेळी कामगारांनी संप मागे घेऊन ते हळूहळू कामावर हजर झाले. कापड उद्योगाखालोखाल मुंबई प्रांतातील इंजिनियरिंग उद्योगात इ.स. १९३९ मध्ये ३९९ कारखान्यात ३०,९२५ कामगार होते. इ.स.१९४७ मध्ये ही संख्या ६४७ कारखान्यांत ५३,२९८ कामगार अशी होती. आर्थिक मंदी (इ.स. १९२९-३२) व तिचा मुंबई गिरणी कामगारांवरील परिणामः - इ.स.१९२९-३२ या काळातील जागतिक मंदीचा परिणाम मुंबई व अहमदाबाद शहरातील कापड गिरणी कामगारांवरही झाला. इ.स. १९३१ मध्ये मुंबईत ७३ कापड गिरण्या होत्या, तर इ.स. १९३४ मध्ये ती संख्या ९६००० साली आर्थिक मंदीमुळे कापडाला मागणी नसल्याने विक्री न झाल्याने कापड गिरणीत काम करणारांच्या कामगारांच्या पगारात ४० टक्के कपात केली गेली. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत गांधीजींनी विदेशी कापडावर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतल्यामुळे गिरणी मालकांचाच फायदा झाला व त्यांनी काँग्रेसला आर्थिक सहकार्य केले.

**Bombay Textile Labour Union:-**

२३ जानेवारी १९२६ रोजी ही संघटना स्थापन झाली. ना. म. जोशी या संघटनेचे आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास /५४७ अध्यक्ष होते. रघुनाथराव वखले सरचिटणीस होते. आसवले, जिनवाला, झाबवाला बाबासाहेब बोले हे चौघे या संघटनेचे उपाध्यक्ष होते. शक्यतो संप टाळावेत व संप अ असल्यास कामगारांना संपकाळात साहाय्य करण्याचे या संघटनेचे धोरण होते. इ.स.१९६ च्या अखेर या संघटनेची संख्या १०,००० होती. मुंबईतील कुर्ला व मदनपूर हा भाग संघटनेचा बालेकिल्ला होता.

इ.स. १९३०-१९३३ या चार वर्षात जागतिक आर्थिक मंदीचा फटका उद्योग व्यवसायास बसला. मुंबईतील कारखान्यांत काम करणाऱ्या अडीच लाख औद्योगिक कामगारांपैकी किमान एक लाख कामगार बेकार होते. केवळ

कापड उद्योगात दीड लाखापैकी ५४,००० कामगार बेकार झाले होते. महाराष्ट्रात सर्वात कमी वेतन सोलापूर येथील कामगारांना होते

त्यांना आर्थिक मंदीच्या काळात दरमहा १० रु. मिळत. मुंबई व सोलापुरातील काप गिरण्यांत जाडेभरडे कापड तयार होई तर अहमदाबाद व सुरतला उत्तम प्रतीचे कापड तयार होई कापड गिरण्यांच्या मालकांनी नवी यंत्रे बसविल्याने गिरणी मालकांनी कामगारांची कपात केली. लाल बावटा युनियन ही कापड गिरण्यातील सर्वात मोठी कामगार संघटना होती; पण ती गटबाजीने पोखरली गेली. ती चालवणाऱ्या कम्युनिस्टांमध्ये परस्परांवर आरोप करण्याची स्पर्धा सुरू झाली. त्यामुळे संघनटेचे बळ खच्ची होत होते. इ.स. १९३२० ३३ मध्ये मुंबईतील कामगार चळवळीत देशपांडे मास्तर, बी. टी. रणदिवे आणि रॉयवाद्यांचा गट असे ३ गट स्पर्धा करीत होते.

इ.स. १९२६ मध्ये मुंबईत ७८ कापडी गिरण्या होत्या. इ.स. १९३४ मध्ये संख्या ५५ झाली. इ.स. १९२६ मध्ये कापड उद्योगात दीड लाख कामगार होते. इ.स १९३४ मध्ये ती संख्या ९६००० झाली. इ.स. १९३४ मध्ये मुंबईतील कापड गिरण्यांन काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनात ३० ते ४० टक्के कपात करण्यात आली होती इ.स. १९३४ मध्ये कामगारांना दरमहा २५ ते ३० रुपये एवढाच पगार मिळे, सोलापूरमधील स्त्री-कामगारांना दरमहा १० रुपयांपेक्षाही कमी वेतन मिळे. गिरणी मालकांनी जुनीपुराणी यंत्रसामग्री काढून टाकून त्याऐवजी नवीन यंत्रांचा वापर करून उत्पादन वाढविण्याचे धोरण आखले. त्यामुळे कामगार कपात ही अटळ झाली.

लाल बावटा युनियन ही कापड गिरण्यांतील सर्वात मोठी कामगार संघटना गटबाजीमुळे दुबळी झाली.
इ.स. १९३२ ३३ मध्ये मुंबईतील कामगार चळवळीत देशपांडे मास्तर, रणदिवे रॉयवाद्यांचा गट असे तीन गट स्पर्धा करीत होते. व १९११ चा फॅक्टरी ॲक्ट स्मिथ कमिशनच्या अहवालावर आधारित १९११
चा फॅक्टरी ॲक्ट लागू करण्यात आला. त्या ॲक्टमधील तरतुदी - १) मुलाच्या कामाचे तास ६ करण्यात आले.
२) स्त्रियांच्या कामावर रात्रपाळीची बंदी करण्यात आली. ३) पुरुषाच्या कामाचे तास १२ निर्धारित करण्यात आले.

**१९३८ चा बालमजुर कायदा :-**

रेल्वे व गोदीमध्ये सामानाची ने आण करण्यासाठी १५ वर्षाखालील मुलांना या कायद्यान्वये बंदी घालण्यात आली. १९३९ मध्ये आगपेटीच्या व्यवसायात १२ वर्षाखालील मुलांना कामावर येण्यास बंदी घालण्यात आली.

इ.स. १९३७ मध्ये मुंबई इलाख्यात झालेल्या ८८ औद्योगिक तंट्यात १ लाख १० हजार कामगारांनी काम थांबवले, तर इ.स. १९३८ मध्ये १११ औद्योगिक कलहाचा फटका ६२ हजारपेक्षा जास्त कामगारांना बसला. एस. एम. जोशी यांनी इ.स. १९३६ नंतर कामगार चळवळीत जाणीवपूर्वक भाग पतला. पुण्यात त्यांनी तांब्या पितळेची भांडी तयार करणाऱ्या कामगारांची संघटना बांधली, डी. जी. लाड यांच्यासोबत विडी कामगारांच्या युनियनमध्ये काम केले. स्वातंत्र्यानंतर पुण्यातील Defence Labourers Union मध्येही त्यांनी काम केले.

१९३८ मध्ये मालक मजूर तंटा निवारण कायदा पास झाला. पण हा कायदा मजुरांच्या माना कापणारा आहे असे मत आंबेडकरांनी १२ नोव्हेंबर १९३८ च्या 'जनता' पत्रात मांडले होते. कामगार हा मनुष्य आहे व मानवाचे जे हक्क आहेत ते कामगारांना असले पाहिजेत असे आंबेडकर म्हणत. १५ मे १९३८ रोजी देवरूख येथील सभेत त्यांनी म्हटले, 'बहुसंख्याक असा शेतकरी व कामगार वर्ग हा देशाचा खरा सत्ताधारी वर्ग बनला पाहिजे.'

**बोनस व महागाई भत्त्यासाठी संप :-**

दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील वस्तूंची झालेली भाववाढ व राहणीमानाचा वाढलेला खर्च विचारात घेऊन महागाई भत्त्यासाठी मुंबईतील ६४ गिरण्यांपैकी ६० गिरण्यांमधील मजूर ४ मार्च १९४० रोजी संपावर गेले. डांगे, मिरजकर व रणदिवे या कामगार नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. ४ मार्च १९४० पासून अमळनेर, सोलापूर व मुंबईतील रेशमी व लोकरी कापड उद्योगातील कामगारही संपावर गेले. कामगारांची बोनसची मागणी मान्य झाली. औद्योगिक न्यायालयाने इ.स.१९४६ मध्ये २१.५ टक्के बोनस (एकूण अडीच महिन्यांच्या पगाराएवढा) द्यावा असे सांगितले. इ.स. १९४७ मध्ये त्यात १ टक्का वाढ करण्यात आली.

मुंबई प्रांतातील कापड गिरण्यांनी मिळवलेला नफा :-

Indian Trade Union Congress (इंटक) ही कॉंग्रेस नेत्यांनी स्थापन संघटना होती. तर स. का. पाटील यांनी इ.स. १९४५ मध्ये बॉम्बे मिल मजदूर युनियन ही संघटना स्थापन केली होती. इ.स. १९४७ मध्ये या दोन्ही संस्थांचे विलीनीकरण होऊन राष्ट्रीय मिल मजदूर संघ स्थापन झाला. स्वातंत्र्यानंतर वालचंद उद्योग समूह, किर्लोस्कर समूह यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात मोठे योगदान दिले.

१९४८ चा फॅक्टरी ॲक्ट या कायद्यातील तरतुदी

१) ८ तास काम, आठवड्यात ४८ तास काम.

२) १४ वर्षाच्या खालच्या मुलांना कामावर न ठेवणे.

३) स्त्रियांना संध्याकाळी ७ नंतर काम देऊ नये.

४) ५०० पेक्षा जास्त कामगार असतील तर कामगार कल्याण अधिकारी नियुक्त करावा

५) १० पेक्षा अधिक कामगार असणाऱ्या कारखान्यांनाच हा कायदा लागू.

१९४८ चा किमान वेतन कायदा १३ असंघटित उद्योग (लोकर, तांदुळव पीठाच्या गिरण्या, विडी उद्योग, रस्ते बांधकाम) वाहतुक, कातडी कमावणे इत्यादीसाठी हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्यानुसार केंद्र व घटक सरकारांना कामाचे वेतन ठरविण्याचा अधिकार प्राप्त झाला. पाच वर्षांनी दुरुस्ती करण्याची तरतुद या कायद्यात होती

**कामगारांची संख्या**

इ.स. १९३९ मध्ये कापड किरण्यांतील कामगारास मजुरीपोटी दरवर्षी सरासरी वार्षिक उत्पन्न ३२० रुपये होते. पण इ.स. १९४६ मध्ये मात्र त्यांचे वार्षीक उत्पन्न ७२१ रु. एकी वाढले. ही पगारवाढ फसवी होती. कारण जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढल्याने वस्तुत त्यांचे उत्पन्न घटलेलेच होते.